




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ८८ * नांदेड * शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# राज्यात अवकाळी पाऊस; शेतकऱ्यांचं मोठं नुकसान

## मराठवाडा-विदर्भ, कोल्हातूर ते सोलापूर, पुण्यातही सरी

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यातील अनेक जिल्ह्यात विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली असून कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही पावसाने दमदार आगमन केले. कडक उन्हाळ्याने नागरिक त्रस्त झाले असतानाच त्यांना पावसाच्या हलक्या सरींनी गारवा अनुभवायला मिळाला. मात्र, अवकाळी आलेल्या या पावसाने शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंतेत असल्याचं दिसून आलं.



कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातही झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झालं आहे. फळभाज्या, पालेभाज्यासह कलिंगडाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

मराठवाड्यात मागील दोन दिवसांत झालेल्या गारपीट अवकाळी पावसामुळे १२२ गावांतील ५ हजार ४०९ शेतकऱ्यांना फटका बसला असून, ३ हजार २६१ हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. त्यात सर्वाधिक २ हजार ६६५ हेक्टरवरील नुकसान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहे.

बीडमध्येही अवकाळी आणि गारपिटीचा फळबागांना फटका, फळ गळतीने बागांचे नुकसान झाले आहे. तसेच, धाराशिव जिल्ह्यात देखील अवकाळीचा पुन्हा तडाखा बसला, वादळवाऱ्याने आणि गारपिटीने आंब्याला मोठा फटका बसला असून बळीराजाचं नुकसान झालंय. लातूरमध्ये अवकाळी पावसाने टोमॅटो उत्पादकांचे कंबरडे मोडले असून खराब झालेले टमाटे उकिरड्यावर फेकण्याची वेळ आली आहे. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी अवकाळी पावसाचा तडाखा बसला, ज्यामध्ये हजारो हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत. वाशिम जिल्ह्यातही वादळी वारा आणि पावसामुळे बिजवाई कांद्याचे नुकसान झाले. नागपूर जिल्ह्याला मध्यरात्री अवकाळी पावसाने चांगले झोडपले, सतत दोन तास झालेल्या या पावसाने विशेष करुन पालेभाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

### २० जिल्ह्यांना अलर्ट

राज्यात पश्चिमी विक्षोभ सक्रिय झाला असून, जवळपास २० जिल्ह्यांना हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. २० पैकी १३ राज्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे, तर ७ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, ज्यामध्ये अहिल्यानगर, जालना, बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली आणि जळगाव या जिल्ह्यांचा समावेश आहे.

# लाडकी बहीण योजनेतून तब्बल ७१ लाख महिलांना डच्चू

**मुंबई (प्रतिनिधी)-** महाराष्ट्र राज्य सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीनंतर करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये तब्बल ७१ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. सुरुवातीला पात्रतेचे निकष शिथिल ठेवल्यामुळे आणि अर्जांची पडताळणी प्रलंबित ठेवल्यामुळे हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. या अपात्र लाभार्थ्यांवर सरकारने गेल्या २० महिन्यांत सुमारे २१,३०० कोटी रुपये खर्च केले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी जुलै २०२४ मध्ये ही योजना सुरू केली होती. तेव्हा या योजनेला महिलांचा प्रतिसाद प्रचंड होता. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी ही योजना सुरू केली होती. सुरुवातीच्या काळात या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी अर्जांची छाननी न करता अर्ज भरणाऱ्या प्रत्येक महिलेला १५०० रुपये देण्यास सुरुवात झाली. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ही संख्या २ कोटी ४७ लाखांवर पोहोचली होती. या सर्व महिलांना पात्र समजून त्यांच्या खात्यात दरमहा अनुदान जमा करण्यात आले. निवडणुकांचे वातावरण आणि योजनेची लोकप्रियता पाहता, प्रशासनाने सुरुवातीला अर्जांची सखोल छाननी केली नाही. अर्ज भरा आणि लाभ मिळवा या धर्तीवर अंमलबजावणी सुरू केली.

# भोकर शहरातील दोन मुले भोसीजवळील कॅनॉलमध्ये वाहून गेले

## रात्री उशिरापर्यंत शोधकार्य सुरू

**भोकर (प्रतिनिधी)-** तालुक्यातील भोसी गावाजवळून जाणाऱ्या मुख्य कॅनॉलमध्ये दोन मुले वाहून गेल्याची घटना दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली. शेख रिजवान शेख शादुल (१७) आणि नुमान बेग समीउल्ला बेग (१८) अशी वाहून गेलेल्या मुलांची नावे असून, ते दोघेही भोकर शहरातील शास्त्रीनगर भागातील रहिवासी आहेत. या घटनेमुळे संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रिजवान आणि नुमान हे दोघे मित्र भोसी जवळील 'गदा मारुती' येथे आयोजित भंडाऱ्यात जेवण करुन घराकडे परत येत असताना कॅनॉलच्या काठावर हात-पाय धुण्यासाठी ते थांबले. मात्र धरणातून पाणी सोडल्यामुळे कॅनॉलचा प्रवाह धोक्याच्या पातळीवर आणि अत्यंत वेगवान आहे. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही प्रवाहाच्या ओढ्यामुळे वाहून गेले. काठावर त्यांची मोटारसायकल आणि इतर वस्तू असल्याचे निदर्शनास आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी आपल्या सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी शोध मोहिमेला गती दिली आहे. सध्या पोलीस जमादार दीपक कंधारे हे या शोधकार्याचे नेतृत्व करत असून पोलीस यंत्रणा पूर्ण क्षमतेने तरुणांचा शोध घेत आहे.



पोलिसांसह पोलीस मित्र जुनेद पटेल, भोसी व परिसरातील स्थानिक नागरिक तसेच भोकर शहरातील अनेक तरुणांनी घटनास्थळी धाव घेऊन शोध मोहिमेत सहभाग नोंदवला आहे. पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्याने शोध घेण्यात अडथळे येत असले, तरी स्थानिक पोहणारे आणि तरुणांचे पथक जिवाची पर्वा न करता कॅनॉलच्या पात्रात मुदखेडपर्यंत शोध घेत आहेत.

रात्री उशिरापर्यंत या दोन्ही मुलांचा अद्याप कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. शास्त्रीनगर परिसरातील दोन मुलांचा अशा प्रकारे अपघात झाल्याने परिसरात शोककळा पसरली असून त्यांचे कुटुंबिय व मित्रमंडळी मोठ्या आशेने शोधमोहिमेकडे डोळे लावून बसले आहेत.

# राज्यातील २५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## अनेक जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त बदलले

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्य सरकारने एकाच वेळी २५ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करत प्रशासनात मोठा फेरबदल केला आहे. दोन दिवसांपूर्वीच १० अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतर हा आणखी एक मोठा निर्णय मानला जात आहे. या बदल्यांमध्ये अनेक महत्त्वाच्या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

दि. २ एप्रिल रोजी रात्री करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर: विनय गौडा जी.सी. (पूर्वीचे चंद्रपूर जिल्हाधिकारी), नागपूर: कुमार आशीर्वाद (पूर्वीचे सोलापूर जिल्हाधिकारी), कोल्हापूर: डॉ. विजय राठोड, सोलापूर: कार्तिकेयन एस., चंद्रपूर: श्रीमती वसुमना पंत, लातूर: डॉ. भारत बस्तेवाड, बुलढाणा: डॉ. प्रवीणकुमार देवरे, गोंदिया: डॉ. मंगेश गोंदवले या महत्वाच्या जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश आहे. तर छत्रपती संभाजीनगर: अमोल येडगे (पूर्वीचे कोल्हापूर जिल्हाधिकारी) कोल्हापूर: डॉ. राजेंद्र भारुड, अमरावती: श्रीमती वर्षा लड्डा, सांगली-मिरज-कुपवाड: श्रीमती संजिता मोहपात्रा, जालना: श्रीमती अंजली शर्मा या आयएएस अधिकाऱ्यांची मनपा आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.




# इराण-अमेरिका युद्धात रशियाची 'एन्ट्री'! पुतिन मध्यस्थीसाठी तयार

## इराणने ठेवल्या ४ अटी

**मोस्को (वृत्तसंस्था)-** पाकिस्ताननंतर आता रशियाने, अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण युद्धात मध्यस्थी करण्याची तयारी दर्शवली आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी तिन्ही देशातील संघर्ष लवकर समाप्त करण्यासाठी केलेल्या आवाहनानंतर मॉस्कोतून मध्यस्थीचा प्रस्ताव देण्यात आला आहे.

युद्धग्रस्त प्रदेशात शांती प्रस्थापित व्हावी यासाठी मॉस्को प्रयत्न करण्यास तयार आहे. यासाठी स्थानिक नेत्यांच्या संपर्कात राहू, असे पुतिन यांनी म्हटले आहे. याव्यतिरिक्त, क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी पत्रकारांशी बोलताना, मध्यपूर्वेत वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पुतिन प्रादेशिक नेत्यांच्या संपर्कात आहेत, असे स्पष्ट केले आहे. लष्करी कारवाई थांबावी यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. नेत्यांशी संपर्क केला जात आहे, असे पेस्कोव्ह यांनी बोलताना सांगितले.

### अमेरिकेचा १५ कलमी शांतता प्रस्ताव इराणने फेटाळला

अमेरिकेने शांततेसाठी पाकिस्तानच्या माध्यमातून १५ कलमी शांतता प्रस्ताव इराणसमोर मांडला होता. पण, वास्तववादी प्रस्ताव नसल्याचे कारण देत त्यांनी तो नाकारला होता. दरम्यान, आता इराणने शांतता चर्चेसाठी तयारी दर्शवताना शांतता प्रस्ताव अथवा अटी वास्तवदर्शी असाव्यात असे मत मांडले आहे. प्रस्तावातील मागण्या अथवा अटी राजकीयदृष्ट्या आणि कायदेशीर पातळीवर शक्य होणाऱ्या तसेच त्याला वास्तवाचे भान असावे, असे काझेम जलाली यांनी सांगितले.

# सोशल माध्यमावर व्हायरल झालेल्या पोस्टमुळे मुखेड शहरात तणाव; काही काळ बाजारपेठ बंद

**नांदेड (प्रतिनिधी)-** मुखेड तालुक्यातील सावरगाव येथे युवकाने एका समाजाच्या धर्मगुरुबद्दल अपशब्द वापरून सोशल माध्यमावर पोस्ट व्हायरल केली होती. याचे गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी दुपारी मुखेड शहरात पडसाद उमटले. या वादामुळे २ तास बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती. याप्रकरणी परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन्ही गटातील ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन दिवसांपूर्वी मुखेड तालुक्यातील सावरगाव येथील युवकाने एका समाजाच्या धर्मगुरूबद्दल अपशब्द वापरून सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केली होती. ही माहिती काही कार्यकर्त्यांना समजल्यानंतर त्या युवकास कार्यकर्त्यांनी पकडून समाजाची माफी मागायला लावली होती. परंतु हा व्हिडिओ पुन्हा व्हायरल झाला. या प्रकरणाचे मुखेड शहरामध्ये गुरुवारी पडसाद उमटले. या प्रकारामुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.





**नांदेड :** श्री हनुमान जयंतीनिमित्त हनुमानगड येथील हनुमान मंदिरात भाविकांनी दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. (छाया : करणसिंह बैस)

# जुना मोंढा भागात व्यापाऱ्याला खंजर दाखवून १० लाख ५० हजारांची बॅग लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहराच्या जुना मोंढा भागात असलेल्या अरबुदा ट्रेडिंग या दुकानात अनोळखी तीन चोरट्यांनी घुसून दुकानदारास खंजरचा धाक दाखविला आणि दहा लाख पन्नास हजार रुपये असलेली बॅग जबरीने चोरून नेली. ही घटना दि. ३० मार्च रोजी रात्री आठच्या सुमारास घडली.

या प्रकरणी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, दुकानदार सोहनलाल मोतीलाल परमार (वय ४०, रा. तरोपंती भवन, नेहरू रोड, जालना) हे आपल्या कार्यालयात असताना आरोपींनी ऑफिसमध्ये घुसून खंजराचा धाक दाखवून त्यांच्या जवळील १० लाख ५० हजार रकमेची बॅग जबरदस्तीने चोरून नेली.



सोहनलाल परमार यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलिसांनी अनोळखी तीन चोरट्यांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक लोंढे करत आहेत. या प्रकरणाचा पोलिसांनी उलगडा केला असल्याचे सांगण्यात आले. आरोपींच्या अटकेसाठी तसेच मुद्देमालाच्या शोधासाठी पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.






# नंदगिरी किल्ल्यावर आजपासून शिवकालीन अस्सल सुवर्ण होन, प्राचीन नाणी व पुरातन शस्त्र, आयुधे यांचे प्रदर्शन

## तीन दिवस ऐतिहासिक, दुर्मिळ व प्राचीन ठेव्यांचे दर्शन घडणार

**नांदेड (प्रतिनिधी)-** येथील जुन्या नांदेडमधील ऐतिहासिक नंदगिरी किल्ला येथे आज शुक्रवार, दि.३ एप्रिल ते दि.५ एप्रिल २०२६ या कालावधीत छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचा साक्षीदार असलेल्या शिवकालीन सुवर्ण होन, दोन हजार वर्षांपासूनची प्राचीन नाणी व पुरातन शस्त्रे व आयुधे यांचे आगळे-वेगळे अभिनव प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले नांदेडच्या नंदगिरी किल्लेदार व नंदगिरी किल्ला संवर्धन संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचा साक्षीदार असलेल्या सुवर्ण होन (सुवर्ण नाणे) प्रदर्शनाचे उद्घाटन दि.३ एपिल रोजी सायंकाळी पाच वाजता होणार आहे.



या समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, इंटेकचे चेअरमन अशोकसिंघ ठाकूर यांची उपस्थिती राहणार आहे.

इसवि सन पूर्व ६०० पासूनची दुर्मिळ नाणी यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन दि.४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोकराव चव्हाण हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून भोकरच्या आमदार श्रीजया चव्हाण यांची उपस्थिती राहणार आहे.

महाराष्ट्र व कर्नाटकातील ऐतिहासिक असलेल्या १२ किल्ल्यांच्या छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन दि.४ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर हे राहणार आहेत, तर प्रमुख अतिथी म्हणून नांदेड मनपाच्या महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत यांची उपस्थिती राहणार आहे.

या प्रदर्शनाचा समारोप समारंभ दि.५ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी नांदेडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र ब्रम्हे राहणार असून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे तसेच प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नंदगिरी किल्ल्याचे किल्लेदार व नंदगिरी किल्ला संवर्धन संस्था, नांदेड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

गेल्या तीन वर्षांपासून अहोरात्र प्रयत्न करून सुरज गुरव व नंदगिरीच्या किल्लेदार यांनी नंदगिरीच्या किल्ल्यास एक रूप दिले. नामशेष झालेल्या किल्ल्यावर दर रविवारी मोहीमा राबवून किल्ल्यांची दखल घ्यायला भाग पाडले. त्यातूनच शासनाने ६ कोटी २९ लाख रूपये मंजूर केल्याने किल्ल्यावर सध्या दुरुस्तीचे काम प्रगती पथावर चालू आहे. नांदेडचा किल्ला आकार घेत असून भविष्यात तो नांदेड मधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ म्हणून नावारूपाला येईल हा विश्वास किल्लेदार यांना आहे.

# बोरगडवाडी येथे विजेचा शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू

**अर्धापूर (प्रतिनिधी)-** तालुक्यातील बोरगडवाडी येथे विजेचा शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

अर्धापूर तालुक्यातील बोरगडवाडी (अमरापूर) शिवारात दि. २ मार्च रोजी वादळी वारे व पावसामुळे शेतातील विजेची तार तुटला होती. दुपारी २ वाजता शेतकरी परसराम पुरभाजी कदम हे शेतात गेले असता विजेची तार तुटली असल्याची माहिती नसल्यामुळे त्यांचा तारेला स्पर्श होऊन मृत्यू झाला.



शेतकरी परसराम पुरभाजी कदम यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, दोन भाऊ, चार मुली, एक मुलगा असा परिवार आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# माहितीचा अधिकार आणि धोक्यात आलेले जीव

आधुनिक लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता आणि गोपनीयता हे दोन्ही मूलभूत स्तंभ मानले जातात. एकीकडे पारदर्शकता शासनाला उत्तरदायी बनवते, नागरिकांना माहिती मिळवण्याचा अधिकार देते आणि सत्तेवर नियंत्रण ठेवण्याचे साधन ठरते; तर दुसरीकडे गोपनीयता व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करते. वरकरणी हे दोन्ही मूल्ये एकमेकांच्या विरोधात उभी असल्यासारखी वाटतात, पण प्रत्यक्षात सुयोग्य संतुलन राखल्यास ती परस्परपूरक ठरू शकतात. मात्र आपल्या देशातील वास्तव पाहिले तर, या संतुलनाचा प्रश्न केवळ कायदेशीर न राहता जीवघेणा बनत चालला आहे. आपल्या देशात २००५ मध्ये माहितीचा अधिकार कायदा (आरटीआय) लागू करून जगातील एक प्रभावी पारदर्शकता यंत्रणा उभारली. या कायद्यामुळे नागरिकांना कोणत्याही शासकीय कार्यालयाकडून माहिती मागण्याचा अधिकार मिळाला. भ्रष्टाचार उघडकीस आणणे, प्रशासनातील त्रुटी प्रकाशात आणणे आणि सामान्य नागरिकांना सशक्त बनवणे यामध्ये या कायद्याने महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक घोटाळे, गैरव्यवहार आणि अनियमितता या माध्यमातून समोर आले, हीच त्याची खरी ताकद आहे. परंतु या ताकदीची किंमत आज काही जणांना प्राण देऊन चुकवावी लागत आहे, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. माहितीच्या अधिकाराचा वापर करून भ्रष्टाचार उघड करणाऱ्या कार्यकर्त्यांवर हल्ले होणे, त्यांना धमक्या देणे आणि काही प्रकरणांमध्ये त्यांची निर्घृण हत्या होणे, ही लोकशाहीसाठी लज्जास्पद बाब आहे. जे नागरिक शासनाला जबाबदार धरण्याचे काम करतात, त्यांच्याच जीविताला धोका निर्माण होतो, हे चित्र अत्यंत चिंताजनक आहे. अर्थात या कायद्याचा आधार घेऊन अधिकाऱ्यांचा छळ करून स्वतःची तुंबडी भरणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या देखील खूप वाढली आहे. यावरही अंकुश आणणे तेवढेच गरजेचे आहे. सध्याची परिस्थिती केवळ कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दाखवत नाही, तर व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या अपारदर्शकतेचे आणि सत्ताधाऱ्यांच्या असहिष्णुतेचे द्योतक आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते म्हणजे समाजातील 'अंकुश', ते सार्वजनिक हितासाठी प्रश्न विचारतात. परंतु त्यांना संरक्षण देण्याऐवजी त्यांच्यावर हल्ले होणे, हे लोकशाही मूल्यांवरच आघात करणारे आहे. याच वेळी, गोपनीयतेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा बनला आहे. २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला. त्यानंतर २०२३ मध्ये डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा लागू करण्यात आला. या कायद्याने वैयक्तिक माहितीचे संरक्षण, संमती आणि जबाबदारी यावर भर दिला. परंतु या कायद्याच्या काही तरतुदींमुळे माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येणाऱ्या माहितीवर मर्यादा येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे पारदर्शकता आणि गोपनीयता यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. उदाहरणार्थ, एखाद्या अधिकाऱ्याच्या मालमत्तेची माहिती मागितल्यास ती सार्वजनिक हिताची आहे का, की वैयक्तिक गोपनीयतेचा भंग आहे? अशा प्रश्नांवर स्पष्ट आणि संतुलित धोरणाची गरज आहे. अन्यथा, गोपनीयतेच्या नावाखाली पारदर्शकतेवर पडदा टाकण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. जगातील इतर देशांनी या संतुलनासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. युनायटेड किंगडममध्ये माहितीचा अधिकार आणि डेटा संरक्षण यासाठी स्वतंत्र, पण समन्वयित व्यवस्था आहे. सार्वजनिक हिताच्या कसोटीवर माहिती देण्याचा निर्णय घेतला जातो. काही ठिकाणी 'अनामिकीकरण' अर्थात निनावी व्यवस्था करून माहिती दिली जाते, ज्यामुळे गोपनीयता राखली जाते आणि पारदर्शकताही टिकून राहते. अमेरिकेत विविध क्षेत्रनिहाय कायदे आहेत, तर चीनमध्ये गोपनीयतेवर भर असला तरी पारदर्शकतेचा अभाव दिसतो. भारतासाठी या अनुभवांमधून शिकण्यासारखे बरेच आहे. मात्र सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे की माहितीचा अधिकार वापरणाऱ्यांचे संरक्षण. कायद्याने अधिकार दिला, पण त्याचा वापर करणाऱ्यांचा जीव धोक्यात असेल, तर तो अधिकार कागदावरच राहतो. आरटीआय कार्यकर्त्यांसाठी स्वतंत्र संरक्षण यंत्रणा, तक्रारींची तत्काळ चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाई ही काळाची गरज आहे. याशिवाय, माहिती उघड करणाऱ्यांसाठी प्रभावी कायदे आणि त्यांची अंमलबजावणी आवश्यक आहे. शासनाने पारदर्शकता वाढवण्यासाठी स्वतःहून माहिती सार्वजनिक करण्याची पद्धत मजबूत करावी, जेणेकरून नागरिकांना वारंवार या कायद्याचा आधार घ्यावा लागू नये. कारण पारदर्शकता आणि गोपनीयता यांचा समतोल साधणे हे कोणत्याही आधुनिक लोकशाहीचे मोठे आव्हान आहे. परंतु या संतुलनाच्या प्रक्रियेत नागरिकांचा जीव धोक्यात येणे, हे कोणत्याही परिस्थितीत मान्य होऊ शकत नाही. माहितीचा अधिकार हा केवळ कायदेशीर हक्क नाही; तो लोकशाहीचा श्वास आहे, आणि हा श्वास गुदमरू लागला, तर लोकशाहीही कमजोर होते. म्हणूनच, आज गरज आहे ती केवळ कायदे करण्याची नाही, तर त्या कायद्यांना मानवी चेहरा देण्याची, जिथे पारदर्शकता सुरक्षित असेल, गोपनीयता संरक्षित असेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सत्य उघड करणाऱ्यांचे जीव सुरक्षित असतील.

# राजांचे राजा : छत्रपती शिवाजी महाराज

भारतीय इतिहासात रत्नासारखी व ज्यांचा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असे जे थोर पुरूष होऊन गेले त्यांपैकी छत्रपती शिवाजी महाराज जाज्वल्य होत. छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा हा कोणत्याही व्यक्तिगत लाभासाठी नव्हता, तर तो परिवर्तनासाठी होता. हिंदू व मुस्लीम यांच्यातील संघर्ष नव्हता. सर्व मानवी अधिकार नाकारलेल्या जनतेला, प्रजेला सन्मानाने जगता यावे यासाठी, स्वराज्यासाठी, लोकशाहीसाठी, समतेसाठी महाराजांचा लढा होता. त्यामुळे रयतेच्या मानसिकतेत बदल करून छत्रपती शिवाजी महाराजांनी राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील गुलामगिरी मोडून काढली. समता, बंधुता, न्यायी स्थापित केली. अशा या समतावादी राजांचा जन्म अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी किल्ले शिवनेरीवर सूर्यास्तसमयी एका नवसूर्याचा जन्म झाला. तोच सूर्य म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. त्यांच्या आईचे नाव जिजामाता तर पित्याचे नाव शहाजी राजे भोसले होते.

शिवाजी महाराजांचे बालपण खडतर होते. बालशिवाजी व जिजामाता बंगलुर मुक्कामी असताना शहाजी राजांनी बालशिवाजीच्या शिक्षणाची व्यवस्था केली. मराठी, संस्कृत व फारसी भाषेचे शिक्षण दिले. अश्वरोहण, तलवारबाजी, दांडपट्टा, भालाफेक, कुस्ती इत्यादींचे शिक्षण देण्यात आले. जिजाऊमातेने एखाद्या कुशल बाल मानसशास्त्रज्ञाप्रमाणे शिवरायांचे बालपण घडविले. बालशिवरायांवर जिजामातेने बालपणापासूनच स्वराज्य निर्मितीचे धडे दिले. तसेच त्यांना लहान वयातच शूर-विरांच्या गोष्टी सांगितल्या. त्यांना पराक्रम, ज्ञान, चातूर्य, संघटना अशा सद्गुणाचे बाळकडू दिले. त्याचप्रमाणे सर्वांना समान न्याय देणे, स्त्रियांचा आदर करणे, अपराध करणाऱ्यास कठोर शिक्षा देणे अशा अनेक गोष्टींची शिकवण त्यांनी शिवरायांना दिली. शिवराय जेव्हा मोठ्या मोहिमांवर जात, तेव्हा जिजाऊ स्वत: राज्य कारभारावर लक्ष ठेवत असत. त्यांनी शिवरायांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. आई ही जगातील सर्वात मोठी गुरू आणि योद्धा असते. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे राष्ट्रमाता, विरमाता, राजमाता माँसाहेब जिजाऊ होय. राष्ट्रमाता जिजाऊंच्या कानावर महान वारकरी संत जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे नाव आलेले होते. उसंत मिळताच त्या स्वत: शिवाजी, सईबाई, सोयराबाई, व्यंकोजी व निवडक लोकांना घेऊन महाराजांच्या कीर्तनास जात असत. महाराजांचे घणाघाती कीर्तन समाजास परिवर्तनाकडे नेत असे. त्यांनी लोकांच्या मनात विचार जागे केले तसेच लोकांना दया, क्षमा, शांती यांची शिकवण देवून समतेचा उपदेश करत असत. त्यामुळे हा सारा परिसर वैदिक परंपरा झुगारून वारकरी धर्म विचारांचा झाला होता.

जिजाऊंनी शिवरायास वारकरी धर्माची परंपरा सांगितली. संत नामदेव महाराजांनी सुरु केलेली वारकऱ्यांची चळवळ देशभर पोहोचली. एका कीर्तनात स्वत: तुकाराम महाराजांनी शिवाजी राजास उद्देशून अनेक अभंगाची रचना केली. शिव तुझे नाव ठेवली पवित्र छत्रपती सूत्र विश्वाचे. वयाच्या केवळ बाराव्याच वर्षी संत तुकाराम महाराजांनी शिवरायास छत्रपती ही पदवी दिली. ह्या छत्रपतीचे स्वराज्य म्हणजे जगातील पहिले लोकशाही राज्य होय.

तुकाराम महाराजांच्या किर्तनातून गावोगावचे मावळे पेटून उठायचे. त्यांचे वारकऱ्यांचे धारकरी बनून शिवाजीराजांच्या सैन्यात दाखल होत असत. तथापि, महान वारकरी संत जगद्गुरु संत तुकाराम महाराज व राष्ट्रमाता जिजामाता यांनी शिवरायावर अतिशय उत्तम संस्कार केले. ते दोघे शिवाजी महाराजांचे खरे गुरू आहेत. शिवरायांचे वडील शहाजी राजे महाराज यांनी शिवरायांना वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षीच दिलेली शिवराजमुद्रा स्पष्टपणे विश्ववंदिता असा उल्लेख करते. अर्थात शहाजी राजांनी शिवरायांची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली होती. ती मुद्रा अशी -

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता
शाहासूनौ: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते

प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणारी आणि साऱ्या विश्वाला वंद्य होणारी अशी शहाजीराजांचा पुत्र शिवाजीराजे यांची राजमुद्रा लोकांच्या कल्याणासाठी आहे असे सांगणारी राजमुद्रा म्हणजे स्वराज्याच्या स्थापनेचा संकेतच होता. त्या काळात राजमुद्रा बहुधा फार्सी भाषेत कोरलेल्या असत, पण शिवरायांची मुद्रा संस्कृत भाषेत होती. विश्वबंधुता, विश्वशांती, विश्सौख्य, विश्वभरभराट, विश्व विकास अशी



उदात्त भावना मनी ठेवूनच स्वराज्याची बांधणी केलेली होती. त्यामुळेच आजही जगातील लोकशाहीवादी स्वतंत्र राष्ट्रे आपल्या शासनास अभिमानाने शिवशाहीचे शासन म्हणतात. आजही छत्रपती शिवाजी महाराजांच्या उंचीचे व्यक्तीमत्व जागतिक इतिहासामध्ये सापडत नाही.

राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान व राष्ट्रभक्ती याचे सर्वोच्च नाव म्हणजे शिवाजी महाराज होत. त्याकाळी हिंदु मुस्लिमांविरूद्ध, मुस्लीम हिंदू विरूद्ध लढत होते. अनेक मराठा सरदार मुस्लिमांच्या पदरी होते. त्यांच्यात होणाऱ्या लढाया जातीसाठी माती खावी अशा नव्हत्या, तर त्या सत्तेसाठी लढाया होत्या. शिवाजी महाराजांचा मोगल, आदिलशाहा यांच्या विरूद्ध राजकीय लढा होता. तो धर्मिक लढा नव्हता. काही इतिहासकारांनी त्यांचा जीवनकाळ म्हणजे सतत मुस्लिमांशी संघर्ष रंगवला मात्र त्यामध्ये काही तथ्य नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले. त्यांनी कायद्याचे अधिराज्य स्थापण करून रयतेच्या सर्वांगीण हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवले. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे विज्ञाननिष्ठ, स्त्री-पुरूष समतेला पूरक आणि महत्वाचे म्हणजे सामान्यातल्या सामान्य माणसांच्या कल्याणासाठी होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य स्थापन केले. गुणग्राहता व माणसाची अचूक पारख करणे हे शिवाजी महाराजांच्या अंगी असलेले महत्वाचे गुण होते. त्यांनी फक्त कर्तबगार व निष्ठेला वाव दिला. त्यामुळे त्यांनी कुणालाही वंशपरंपरागत नोकऱ्या दिल्या नाहीत. सर्व जाती-जमातीच्या लोकांना शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीच्या उदात्त कार्याला जोडले व सामान्य जनांना त्यागाची शिकवण दिली. त्यासाठी स्वधर्म व स्वराष्ट्राबद्दलच्या कल्पना सर्व सामान्यापर्यंत नेल्या. जीवा महाल, येसाजी कंक, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते, नेताजी पालकर, शिवाजी कावजी, तानाजी मालूसरे, बाजीप्रभू देशपांडे, बहिर्जी नाईक, काजी हैदर, दौलतखान, नूरबेग, सिद्धी मिस्त्री, मदारी मेहत्तर, फिरंगोजी नरसाळे, येलाजी मांग, रायप्पा महार असे अनेक त्यागी माणसे सामान्य कुटुंबातील होती.

छत्रपती शिवाजी महाराजांची प्रत्येक राजकीय खेळी ही प्रजेच्या कल्याणासाठी करताना बऱ्याचदा शिवरायांना मानहानिकारक प्रसंगांना वा तडजोडींना समोर जावे लागले. स्वराज्याचे म्हणजेच रयतेसाठीचे मोठे स्वप्न सत्यात आणण्याकरीता त्यांनी मिर्झा राजे जयसिंगा सोबत १३ जून १६६५ मध्ये पुरंदरचा तह केला. हा तह करतांना बरेच किल्ले सोडावे लागले, तसेच वार्षिक शुल्क देण्याची तयारी दाखवावी लागली. हा तह करण्यामागे रयतेचे दुरगामी कल्याण शिवरायांच्या नजरेसमोर होते. इथे शिवाजी महाराजांनी अन्य समकालीन राजपूत वा अन्य राजांसारखा आततायीपणा वा अवास्तव स्वाभिमान न वापरता मिर्झा राजांना तहाच्या अनेक चर्चांमध्ये अडकवत स्वत:च्या रयतेचे अधिकाधिक भले साधले. राजांनी रयतेच्या भल्यासाठी जे राजकारण केले ते पूर्णपणे सामाजिक भान ठेवून केलेले होते या तहामध्ये सुद्धा राजाने विजय मिळविला होता.

शिवाजी महाराजांचे आपल्या देशावर फार प्रेम होते आणि मानवी सद्गुणाचे तर ते साक्षात प्रतीक होते. छत्रपती शिवाजी महाराजांना खऱ्या आर्थाने जर कोणी महाराष्ट्रात दाखवून दिले असेल, तर ते राष्ट्रपिता महात्मा ज्योतीबा फुले यांनी. छत्रपती शिवरायांना इतके दुर्लक्षितव उपेक्षित केले होते की, त्यांची रायगडावरील समाधी कुठे आहे, हे कुणालाच माहीत नव्हते. त्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांनी त्यांच्या समाधीचा शोध घेतला. त्या समाधीच्या आसपासची जागा स्वच्छ केली आणि त्या समाधी स्थळाला फुले वाहिली. अभिवादन केले. त्यांची जयंती त्यांनीच सर्वप्रथम सुरु केली. त्यांच्या जीवनावर प्रदीर्घ असा पोवाडा रचून शिवजयंती उत्सव साजरा केला आणि इतिहासाचे उत्खनन केले. छत्रपती शिवाजी महाराजांना कुळवाडी भूषण म्हणून शेतकरी समाजाचा हितचिंतक आणि संरक्षक या रूपात पुढे आणले. तेंव्हापासून आपण सर्वजन मोठ्या उत्साहाने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करतो. छत्रपती शिवाजी महाराज यांनी क्षणभरही विश्रांती न घेता जनहिताची काळजी घेतली. अखंड खटपटीत असतांना महाराज आजारी झाले. ताप येत होता, उपचार झाले; पण इलाज न चालता चैत्र शुद्ध पौर्णिमा दिनांक ३ एप्रिल १६८० मध्ये हा सूर्य मावळला. केवळ त्यांच्या मूर्तीला हार घालून त्यांच्यावर लेख, कथा, कविता लिहून, चित्रपट काढून आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे अनुयायी होवू शकत नाही. आज छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार केवळ सांगून चालणार नाही तर प्रत्येकाने त्यांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनात वाटचाल केली पाहिजे तरच खरे त्यांना अभिवादन ठरेल.

शिवरायांचे आठवावे रूप ।
शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप भूमंडळी ।।


रयतेचे जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आज स्मृतीदिन. त्यानिमित्त त्यांना कोटी कोटी प्रणाम.

-विकास यशवंता कांबळे
हाळदा, ता. कंधार, जि. नांदेड
मो. ९०९६८०१४३४

# स्वातंत्र्यलढ्यातील बौध्दिक नेतृत्व सचिन्द्रनाथ सान्याल

आध्यात्मिक व ऐतिहासिक वारसा असणाऱ्या काशी विश्वनाथाच्या वाराणशी (काशी) शहरात ३ फेब्रुवारी १८९३ ला जन्माला आला एक भारत-मातेचा विरपुत्र सचिन्द्रनाथ सान्याल. या विरपुत्राचे मातापिता होण्याचे परंभाग्य मिळाले वासीनीदेवी व हरिनाथ सान्याल या जोडप्याला. रवींद्रनाथ, जितेंद्रनाथ व भुपेंद्रनाथ हे सचिन्द्रनाथाचे तीन भाऊ.आपल्या सर्व अपत्यांना हरिनाथानी बंगालची क्रांतिकारी संस्था अनुशीलन समितीच्या कार्यात सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. मुलांचा आपल्या हाताने रस्ता काटेरी बनविणाऱ्या जोडीदाराला एका शब्दाने ही विरोध न करणाऱ्या धर्मपत्नी वासिनीदेवी ह्या एका अर्थाने भारतमातेच्या कुशीतून जन्म घेणाऱ्या वीरकन्याच होत्या. असे म्हणावे लागेल. अनुशीलन समितीत सक्रिय सहभागी झाल्यामुळे आपल्या पोटच्या गोळ्यांना काय भोगावे लागणार आणि त्याचा शेवट काय होणार? हे ते मातापिता जाणून नव्हते का? अर्थात याचे उत्तर होय असेच आहे.

हरिनाथ सान्यालानी आपल्या मुलांना दिलेल्या प्रेरणेचे परिणाम दिसायला लागले. सर्वात थोरला मुलगा रवींद्रनाथ याला वाराणसी येथील ब्रिटिशविरोधी कटात सहभागी असल्यामुळे नजरकैद करण्यात आले, तर सर्वात धाकटा भुपेंद्रनाथाना कोकोरी कटात सहभागी असल्यामुळे पाच वर्षांची सक्तमजुरी झाली. जितेंद्रनाथ १९२९ च्या लाहोर षडयंत्र कटात भगतसिंग व साथीदाराच्या सोबत होते.



त्यामुळे त्यांच्या वाट्याला आपल्या भावापेक्षा वेगळे काय येणार?

सचिन्द्रनाथांच्या तारुण्यसुलभ अवस्थेचा प्रारंभ असाच संघर्षमय झाला. १९०५ ला बंगाल विभाजनानंतर ब्रिटिश साम्राज्यशाही विरोधात उगवत्या पिढीला राष्ट्रवादी शिक्षणाची प्रेरणा देऊन स्वातंत्र्यसंग्रामासाठी त्यांच्या रोमारोमांत अंगार फुलविण्याचे कार्य अत्यंत निष्ठेने करीत होते सचिन्द्रनाथ.त्यांच्या संपूर्ण परिवारावरच त्यांच्या निष्ठावान कार्याचा खूप सखोल परिणाम झाला. साम्राज्यवादाच्या विरोधात पूर्ण सान्याल परिवार अत्यंत खंबीरपणे उभा होता. त्यांचा राष्ट्रीय विचारधारेतील दृढनिश्चय ध्रुवताऱ्याला लाजविणारा होता. आपले वैयक्तिक कौटुंबिक नुकसान किती होत आहे किंवा होणार आहे? यासंबंधी विचार करण्यासाठी त्यांना वेळ होता कुठे? किंबहुना त्याची त्यांना गरजच वाटत नव्हती.

सचिन्द्रनाथ पितृछत्राला १९०८ मध्ये पारखे झाले. तेंव्हा त्यांचे वय अवघे पंधरा वर्षाचे होते. त्या अवस्थेतही भारतमाता मुक्तीसाठी ते कटिबद्ध होते. हरिनाथानी दाखविलेल्या मार्गावरून ही हरीची लेकरे चालत राहिली. त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर 'बंदी जीवन' या ग्रंथाला अक्षरबद्ध करण्यासाठी त्यांची लेखणी सरसावली. भारतमाता मुक्तीसाठी त्यांच्याप्रमाणेच समर्पणाची भावना ठेवणाऱ्या असंख्य क्रांतिकारकांच्या वेदनेचा तो हुंकार होता. त्याला आकार देण्याचे कार्य त्यांनी केले.

२१ फेब्रुवारी १९१५ ला गुप्त हल्ला करण्याचे निश्चित करण्यात आले. योजना अयशस्वी झाल्यामुळे सर्वत्र धरपकड व क्रांतिकारकांना फासावर लटकविण्यात गोरी यंत्रणा यशस्वी झाली. नवीन योजनेचा शोध घेणे सुरू झाले.स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काही ठोस योजना आखता यावी यासाठी रासबिहारींनी जपान प्रयाण केले. १२ मे १९१५ ला कलकत्ता बंदरात सन्याल व गिरजाबाबूनी रासबिहारींना सोडले. तीन महिन्यानंतर लाहोर व बनारस षडयंत्राअंतर्गत केस चालवून सन्याला ना काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली. १९२१ मध्ये नागपूर काँग्रेसने राजबंद याच्या सुटकेसाठी केलेले प्रयत्न फलदायी ठरले. क्रांतिकारकांनी गांधीजींच्या सत्याग्रह आंदोलनसमयी एक वर्षभर आपले कार्य स्थगित ठेवण्याचे वचन दिले होते. अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळत असेल तर ते क्रांतिकारकांनाही हवे होते, पण चौरी चौरा आंदोलनाची सर्व व्यथा पाहिल्यावर पुन्हा सशस्त्र क्रांतिकारी संघटन मजबूत केल्याशिवाय ब्रिटिश साम्राज्यशाही झुकणार नाही, याची खात्री त्यांना पटली. १९२३ च्या प्रारंभी रावळपिंडीपासून दानापूरपर्यंत सशस्त्र क्रांतीदलाचे २५ केंद्र स्थापन करण्यात आले. त्या दरम्यान लाहोर येथील टिळक विद्यालयात भगतसिंग, जतींद्रनाथ व अन्य क्रांतिकारकासोबत त्यांचा संपर्क झाला. त्यांना आपल्या दलात सान्यालानी सहभागी करून घेतले. त्यानंतर काही कालावधीतच आपल्या दलाचे नाव हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशन असे ठेवून, त्याची स्थापना करून, त्याची घटना तयार करण्यात आली. घटनेचा उद्देश सुसंघटित आणि सशस्त्र क्रांतीद्वारा भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे व भारतीय लोकतंत्राची स्थापना करणे. यात प्रत्यक्ष कार्य आणि गुप्त संघटन दोन्हीही अपेक्षित होते. तरुणांची मने प्रज्वलित करण्यासाठी क्रांतिकारी साहित्यनिर्मिती सर्वांना महत्वाची वाटत होती. प्रजातंत्राची मांडणी करीत असताना समाजवादी व्यवस्थेची स्थापना महत्वाची वाटत होती. घटनेतील शब्दात या प्रजातंत्रसंघात साम्राज्यशाहीचा अंत केला जाईल. या व्यवस्थेत कुणीही धनिक, सत्ताधारी दुबळ्यांचे शोषण करू शकणार नाही. विदेशात असणाऱ्या भारतीय क्रांतिकारकासोबत घनिष्ठ संबंध ठेवणे हा या कार्यक्रमाचा अत्यावश्यक भाग होता. 'दि रिवोलुशनरी' नावाचा एक संपूर्ण बदल करणारा क्रांतिकारी जाहीरनामा तयार करून पंजाबपासून बर्मापर्यन्त वाटण्यात आला. त्याचे प्रकाशक व लेखक सचिन्द्रनाथ असल्यामुळे त्यांना त्वरित अटक करण्यात आली. बांकुडा येथे त्यांच्यावर न्यायालयीन केस चालवून राजद्रोहाच्या आरोपाखाली दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा त्यांना देण्यात आली.

तुरुंगात असतानाच अतिशय कर्तव्यदक्ष ब्रिटिश सरकारने ते कोकोरी कटात सहभागी असल्यामुळे आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली. १९३७ मध्ये सयुंक्त प्रदेशात काँग्रेस मंत्री मंडळाची स्थापना झाल्यावर अन्य क्रांतिकारका- सोबत त्यांची सुटका झाली. सुटकेनंतर काशीत त्यांनी 'अग्रगामी' नावाचे एक दैनिक सुरू केले. त्यामधून ब्रिटिश सत्तेवर प्रहार करणे आणि क्रांतिकार्याला प्रोत्साहन देणे. हे कार्य त्यांनी जोमाने सुरू केले. त्यामुळे राजस्थानच्या देवली शिबीर येथे त्यांना नजरबंद करण्यात आले. या वेळी त्यांना क्षयरोगाने ग्रासले. इलाज करण्यासाठी त्यांना सोडण्यात आले. पण क्षय रोगाने ७ फेब्रुवारी १९४२ ला त्यांचा अंत होईपर्यंत त्यांची साथ सोडली नाही. क्रांतिकारी आंदोलनाला दिशा देण्याचे अत्यंत जोखमीचे कार्य त्यांनी सांभाळले.विशिष्ट दार्शनिक सिद्धांताशिवाय कोणतेही आंदोलन यशस्वी होऊ शकत नाही. हा विचार त्यांनी 'विचारविनिमय' नावाच्या आपल्या ग्रंथसंपदेत स्पष्ट केला. क्रांतीला दिशा देण्याचे कार्य त्यांनी आपल्या लेखणी, वाणी व कृतीतून पार पाडले. साहित्य, समाज, धर्म व राष्ट्र यांचा सहसंबंध स्पष्ट करून त्यातून प्रभावी राष्ट्रजागरणाचा परिचय त्यांनी समस्त भारतीयांना करून दिला. ३ एप्रिल हा त्यांचा जन्मदिवस त्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण आम्हाला राष्ट्रकार्य करण्याची प्रेरणा देईल अशी अपेक्षा करूया.

-प्रा. वसंत गिरी
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घाला

सोशल मीडिया हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आजचे युगच सोशल मीडियाचे युग आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण आज सोशल मीडिया ही जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण सोशल मीडियावर सक्रिय आहेत. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे आणि या स्मार्ट फोन मध्ये व्हॉट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, शेअर चाट, स्नॅप चाट, यु ट्यूब अशा अनेक सोशल मीडियावर साईट आहेत. या सोशल मीडिया साईटवर सतत सक्रिय राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवण्यासाठी जो तो धडपडत असतो. विशेषतः किशोवयीन आणि तरुण मुलांमध्ये या सोशल मीडिया साईटची भलतीच भुरळ आहे.

आजची युवा पिढी आपला सर्वाधिक वेळ सोशल मीडियावरच व्यतीत करते. एका सर्व्हेक्षणानुसार आपल्या देशातील मुले दररोज सरासरी पाच तास सोशल मीडियावर व्यतीत करतात. याचाच अर्थ आपली मुले सोशल मीडियाच्या आहारी गेली आहेत. ही मुले दिवसभर उपाशी राहू शकतील पण सोशल मीडिया पासून दूर राहू शकणार नाही. विशेष म्हणजे केवळ तरुण मुलेच नाही तर शाळकरी मुले देखील सोशल मीडियाच्या आहारी गेली



आहेत. तंत्रज्ञानाचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. तज्ज्ञांनी अनेकवेळा इशारा देऊनही त्याचा वापर कमी झालेला नाही उलट वाढतच चालला आहे. सोशल मीडियामुळे तर त्याच्या वापर उच्चांकी पातळीवर पोहचला आहे. त्याचे दुष्परिणामही समोर येत आहेत. सोशल मीडियाचा अती वापरामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. सोशल मीडियामुळे मुले हिंसक बनू लागले आहेत. सोशल मीडियामुळे मुलांमधील तणाव वाढला आहे. मुलांना डोळ्यांच्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत अनेक मुलांना लहान वयातच चष्मा लागल आहे. सोशल मीडियामुळे मुले मैदानी खेळ विसरले आहेत.

सोशल मीडियामुळे मुलांमधील संवाद हरपला आहे. मुले एकलकोंडी बनली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सोशल मीडियामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होऊ लागला आहे. मुलांची एकाग्रता भंग झाली आहे. मुले चीडचीडी बनली आहेत म्हणून किमान शाळकरी मुलांना तरी सोशल मीडिया पासून दूर ठेवावे असे तज्ज्ञ सांगत आहेत त्यामुळे अनेक शाळांनी मुलांना शाळेत मोबाईल वापरण्यास बंदी घातली आहे मात्र शाळा सुटल्यावर मुले सोशल मीडियाचा वापर करतातच म्हणून मुलांच्या सोशल मीडिया वापरावर कायद्यानेच बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली आहे. भारत सरकारने अजून तरी शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी आली नसली तरी कर्नाटक सरकारने मात्र या संदर्भात सकारात्मक पाऊल टाकत १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव मांडला आहे. लहान मुले सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नयेत, तसेच लहान मुलांची ऑनलाईन सुरक्षा आणि वाढत्या स्क्रीन टाईम पासून मुलांना वाचवण्यासाठी कर्नाटक सरकारने हा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे बंदीचा प्रस्ताव आणणारं कर्नाटक हे देशातील पहिले राज्य बनले आहे.

कर्नाटक सरकारचे याबाबत जितके कौतुक करावे तितके कमी आहे. कर्नाटक सरकारचा हा अनुकरणीय आहे. कर्नाटक सरकारच्या या निर्णयाचे आंध्रप्रदेश आणि गोवा सरकारनेही अनुकरण करण्याचे ठरवले असून हे राज्यही लवकरच लहान मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घालणार आहेत. आपल्या देशात लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यासंदर्भात आता पावले उचलली जात आहेत मात्र जगातील अनेक देशात याआधीच लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली गेली आहे. दोन वर्षापूर्वी अमेरिकेतील फ्लोरिडा प्रांताने शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली. त्यांनी तसा कायदाच केला आहे. फ्लोरिडा प्रांताचे गव्हर्नर रॉन डी सेंटीस यांनी तसा कायदाच मंजूर करून घेतला.

ऑस्ट्रेलियातही १६ वर्षाखालील मुलांना सोशल मिडीयाचा वापर करण्यास बंदी घातली आहे. आता भारतातही त्या संदर्भात पावले उचलली जात आहे ही सकारात्मक बाब आहे मात्र प्रत्येक राज्यसरकारने आपल्या राज्यपुरता असा निर्णय घेण्याऐवजी जर केंद्र सरकारनेच संसदेत तसा कायदा केला तर तो संपूर्ण देशात एकाच वेळी ही बंदी लागू होईल. त्यामुळे केंद्र सरकारलाच विनंती आहे की त्यांनी संसदेत तसा कायदा करावा अर्थात कायद्यानेच मुलांचे सोशल मिडियाचे व्यसन सुटेल असे नाही तर कायद्याला प्रबोधनाचीही जोड द्यावी लागेल. कायद्यासोबत मुलांचे प्रबोधन केले, मुलांना सोशल मिडियाचे दुष्परिणाम समजावून सांगितले त्यासाठी शाळेत चर्चा सत्र आयोजित केली तर मुलांचे सोशल मिडियाचे व्यसन सुटण्यास नक्कीच मदत होईल. कायद्याने असोत की प्रबोधनाने मुलांचे मुलांचे सोशल मिडियाचे व्यसन सुटणे महत्वाचे आहे.

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मालमत्ता धारकांकडून ११ कोटी १५ लक्ष वसुली



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालयाने १ एप्रिल २५ ते ३१ मार्च २६ अखेर १२७१२ मालमताधारकांकडून ११ कोटी १५ लक्ष ५९ हजार ७९८ रूपये वसुली केली आहे. शेवटच्या दिवशी ३१ मार्च रोजी जवळपास ३८५ मालमत्ताधारकांकडून मालमत्ता कर व पाणीपट्टीपोटी जवळपास ६४ लक्ष रुपये वसुली केली आहे. मनपाच्या सहा क्षेत्रीय कार्यालयात सिडको क्षेत्रीय कार्यालय वसुलीमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, निलेश सुंकेवार, उपायुक्त अजितपाल-सिंघसंधू, सहायक आयुक्त मनीषा नरसाळे यांच्या आदेशानुसार सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्यामार्गदर्शनाखाली कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, कर निरीक्षक संजय नागापूरकर, वसंत कल्याणकर, सादुल्ला खान, नारायण आठवले, वसुली लिपीक मारोती सारंग, मालू एनफळे, प्रकाश दर्शने, नथुराम चवरे, विवेकानंद लोखंडे, अमोल पाईकराव, उत्तम जोंधळे, रविंद्र पवळे, राहुल पाईकराव, रमेश यशवंतकर, दीपक जोंधळे यांनी प्रभाग क्रमांक १९ व २० मधील मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कर व पाणी पट्टी करापोटी मागणी केली तर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या थकबाकीदार यांच्याकडे जप्ती पथकाने संबंधित थकबाकीदार यांच्याकडे असलेल्या मालमत्ता करापोटी संबंधित थकबाकीदाराचा मालमत्ता, पाणीपट्टी पोटी नळ, मलनिःसारण लाईन खंडित केली होती, तर अनेक मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्यासाठी स्वतः सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग व पथकाने भेटी दिल्या, तर उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे कर निरीक्षक व वसुली लिपीक यांची बैठक घेऊन मालमत्ता कराबाबत मार्गदर्शन केले.

१ एप्रिल २५ ते ३१ मार्च २६ अखेर १२७१२ मालमत्ता-धारकांकडून ११ कोटी १५ लक्ष ५९ हजार ७९८ रूपये वसुली करण्यात आली आहे. ३१ मार्च २६ रोजी जवळपास ३८४ मालमत्ताधारकांनी मालमत्ता करापोटी ५५ लक्ष ५५ हजार ४९३ रूपये व पाणी पट्टीपोटी ९ लक्ष ७६ हजार रुपये वसुली केली असून, सहा क्षेत्रीय कार्यालयात सिडको क्षेत्रीय कार्यालय वसुलीमध्ये तीन नंबरवर आले आहे. आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सिडको अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## सहकारी संस्थांसाठी चौकशी प्राधिकृत अधिकारी नामतालिका; अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८३ व ८८ अन्वये सहकारी संस्थांच्या चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यात येत आहे. यासाठी सहकार खात्यातून निवृत्त झालेले (वय ७० वर्षे पूर्ण न झालेले) अधिकारी, निवृत्त न्यायाधीश, वकील तसेच सनदी लेखापाल यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जाचे विहित नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, लातूर येथे तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर/धाराशिव/बीड/नांदेड व संबंधित जिल्ह्यांतील सर्व उपनिबंधक व सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत.

हे अर्ज १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत प्राप्त होऊ शकतात. संबंधित पात्र व्यक्तींनी परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत संबंधित कार्यालयात सादर करावेत. याबाबतची सविस्तर सूचना संबंधित कार्यालयांच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे, असे आवाहन प्रवीण फडणवीस, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी केले आहे.

# किनवट तालुक्यातील थारा येथे ‘महारेशीम अभियान’ नोंदणीचा शुभारंभ

## शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे –जेनीत चंद्रा दोन्तुला

**नांदेड (प्रतिनिधी)**– किनवट तालुक्यातील थारा येथे ‘महारेशीम अभियान’ नोंदणीचा शुभारंभ सहायक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तुला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने रेशीम शेतीसाठी नोंदणी करून सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक शेतीवर न थांबता वस्त्रोद्योगाशी जोडले जाणे आवश्यक आहे. शेतीत उद्योगाचा समावेश करून शेतकऱ्यांना उद्योजक बनविणे हे शासनाचे धोरण असून, रेशीम उद्योग हा त्यासाठी अत्यंत फायदेशीर पर्याय आहे.

कार्यक्रमास जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, क्षेत्र सहायक रेशीम कांचन जाधव, सहायक संचालक प्रवीण भुरके, प्रगतशील शेतकरी कपील सोनटक्के तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहायक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तुला पुढे म्हणाले की, या अभियानाला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास शासनस्तरावर अधिक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. वैयक्तिक स्तरावरही शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात व आवश्यक त्या अनुदानासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल.

जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे यांनी सांगितले की, पोकरा, मनरेगा व ‘सिल्क समग्र’ योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना प्रति एकरी चार लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध आहे. समूहाच्या माध्यमातून रेशीम शेती केल्यास अधिक फायदा होऊन बाजारपेठेतही स्थिर उत्पन्न मिळू शकते.

शेतकऱ्यांनी ५ एप्रिल २०२६ पर्यंत संबंधित अधिकाऱ्यांकडे नोंदणी करावी. उत्पन्नवाढ व वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. रेशीम शेतीसाठी लागणारी सर्वतोपरी मदत रेशीम संचालनालयामार्फत करण्यात येणार आहे. तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड यांनी कृषी विभागाच्या विविध योजना व अनुदानाबाबत माहिती दिली.

# विविध कृषी पुरस्कारांसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्य शासनातर्फे दरवर्षी कृषीक्षेत्रात संघटनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्ती, गट/संस्थेला पुरस्कार देण्यात येतो. उल्लेखनीय/अतिउल्लेखनीय कार्य करणारे तसेच राज्याला, जिल्ह्याला दिशादर्शक ठरणारे शेतकरी, व्यक्ती, संस्था, गट यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतो. विविध कृषी पुरस्कारासाठी जिल्हास्तर समितीकडे अर्ज सादर करण्यास बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आयुक्त कृषी यांनी इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था, गट यांना सन २०२५ पासूनचे विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेबाबत आवाहन केले आहे.

इच्छुक शेतकऱ्यांनी तत्काळ आपला अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करावा. अधिक माहितीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना पुरस्कारासाठी आवश्यक असलेला जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी दाखला प्राप्त करून घेण्यास १५-२० दिवसांचा कालावधी आवश्यक आहे. त्याबरोबर नेटवर्क, तांत्रिक अडचणीमुळे शेतकऱ्यांना विहित मुदतीत अर्ज सादर करण्यास अडचण येत आहे. मार्च महिन्यात आर्थिक वर्षाच्या अनुषंगाने कामकाज असल्याने क्षेत्रीय यंत्रणाना प्रत्यक्ष पडताळणीसाठी देखील कालावधी आवश्यक आहे. त्यामुळे शेतकरी व क्षेत्रीय स्तरावरून दूरध्वनीद्वारे सदरची मुदत वाढवून मिळण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने सन २०२५ करिता विविध कृषी पुरस्कार सादर करण्यासाठी सुधारीत नियोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

अर्जदाराने ऑनलाईन अर्ज भरणे, सहायक कृषी अधिकारी यांनी अर्जदाराच्या ऑनलाईन अर्जाची छाननी करून, समक्ष भेट देऊन अनुषंगिक बाबींच्या पूर्ततेची कार्यवाही करून तालुका कृषी अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे. तालुका कृषी अधिकारी यांनी अर्जदाराचा ऑनलाईन अर्ज छाननी, समक्ष भेट, सहायक कृषी अधिकारी यांचे अभिप्राय यांची प्रत्यक्ष पडताळणी करून जिल्हास्तर समितीकडे अर्ज सादर करण्याचा कालावधी आता बुधवार १५ एप्रिल २०२६ पर्यंत राहील.

जिल्हास्तर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, समक्ष भेट देऊन उल्लेखनीय कार्याबाबतच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिफारशीसह अर्ज विभागस्तरीय समितीकडे सादर करण्याची मुदत गुरूवार ३० एप्रिल २०२६ असेल.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भूशास्त्र संकुलाच्या विद्यार्थ्यांची भरारी

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भूशास्त्र संकुलाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करीत राज्यभर आपला ठसा उमटवला आहे. संकुलातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवले आहे.



भूवैज्ञानिक परीक्षेत चाणक्य तोरणे यांनी अखिल भारतीय स्तरावर ११ वा क्रमांक मिळवत सुमारे १० लाखांच्या वार्षिक पॅकेजसह यश संपादन केले. तसेच डॉ. पांडुरंग बलवंत आणि राकेश निकम यांची सेंटर वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशन येथे वैज्ञानिक पदावर निवड झाली असून त्यांना सुमारे १२ लाखांचे वार्षिक वेतन मिळणार आहे. याशिवाय मुंजाजी भोसले आणि वर्षा शेवाळे यांची सहायक प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली आहे.

प्रशासकीय क्षेत्रातही संकुलातील विद्यार्थ्यांनी आपला दबदबा निर्माण केला आहे. पोशट्टी मुडशे यांची एमपीएससीमार्फत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली आहे. भूजल सर्वेक्षण विभागात अनिकेत राठोड, दीपक वाबळे (सहाय्यक भूवैज्ञानिक), सुधाकर लुटे (सहाय्यक भूभौतिकशास्त्रज्ञ) तसेच अनिल गाडेकर, अभिषेक आदमाने, राहुल मुंडे, करण डव्हळे आणि मनीषा भिलावेकर (कनिष्ठ भूवैज्ञानिक) यांनी यश मिळवले आहे. दरम्यान, २०२४-२५ या वर्षात एकूण १८ विद्यार्थ्यांनी सीएसआयआर-नेट, यूजीसी-नेट, सेट आणि गेट यांसारख्या राष्ट्रीय पात्रता परीक्षांमध्ये यश मिळवत संकुलाची मान उंचावली आहे. १९९६ साली स्थापन झालेल्या या संकुलात भूगर्भशास्त्र, भूभौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र आणि भूगोलशास्त्र या विषयांत पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर ॲम यू-मिनरल एक्सप्लोरेशन अँड कन्सलटन्सी लिमिटेड यांसारख्या संस्थांशी सहकार्य करण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसह ३ लाखांपर्यंत मानधनाची संधी मिळते.

भूजल व्यवस्थापन, भूकंपशास्त्र, खनिज संपत्तीचा शोध आणि ज्वालामुखी यांसारख्या विषयांमध्ये सखोल प्रशिक्षण दिल्यामुळे येथे घडणारे विद्यार्थी उद्योग व संशोधन क्षेत्रासाठी सक्षम मनुष्यबळ म्हणून पुढे येत आहेत.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्यासह संचालक, विभागप्रमुख आणि प्राध्यापकांनी अभिनंदन केले असून, मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी भूशास्त्र क्षेत्र करिअरची नवी ‘सुवर्णसंधी’ ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

## महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त समन्वय समिती स्थापन

**नांदेड (प्रतिनिधी)** –३१ मार्च रोजी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त माजी प्राचार्य डॉ. कारभारी गोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीत महामानवांच्या विचारांचा जागर व्हावा या हेतूने माहे एप्रिल महिन्यात नांदेड येथे एक व्याख्यानमाला आयोजित करण्याच्या उद्देशाने दहा सदस्यीय समन्वय समितीची स्थापना करण्यात आली.

यामध्ये राज अटकोरे, के. एच. वने, दीपक मगर, नारायण अंभोरे, दिलीप गोरे, शेख शकीलाताई, संगीता राऊत, डॉ. बालाजी पोतुलवार, डॉ. दत्ता कुंचेलवाड, संभाजी डुबुकवाड इत्यादींचा समावेश आहे. समितीचे मार्गदर्शक म्हणून माजी प्राचार्य डॉ. के. बी. गोरे व सखाराम शितळे हे काम पाहतील असे सर्वानुमते निश्चित करण्यात आले.

# चौथ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे नांदेडमध्ये आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –सध्याच्या शिक्षण परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर चौथ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन नांदेड येथील विसावा पॅलेस कॉन्फरन्स हॉल, शिवाजीनगर येथे रविवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.

या परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गोविंद रामदिनेवार हे राहणार असून, उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे उपस्थित राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून डी. एम. हनुमंते यांची उपस्थिती राहणार आहे.

पहिल्या सत्रात शिक्षणाचे बाजारीकरण आणि बहुजन समाजावर होणारे दुष्परिणाम या विषयावर बहुजन वंचित आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष फारूक अहमद हे मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी बी.पी.एस.एस.चे कार्याध्यक्ष एस. जी. माचनवार हे राहणार आहेत तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अमोल काळे यांची उपस्थिती राहणार आहे.

तसेच दुसऱ्या सत्रात उच्च शिक्षणासमोरील आव्हाने या विषयावर प्रा. डॉ. दिलीप चव्हाण हे विचार मांडणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. हेमंत कार्ले राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून कॉ. उज्ज्वला पडलवार व ॲड. एस. एम. गोरे यांची उपस्थिती राहणार आहे. तिसरे सत्र प्रश्नोत्तर, चर्चा व संवाद यासाठी राखीव असून, या सत्राच्या अध्यक्षस्थानी बालाजी थोटवे हे राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून डी. डी. सुपे यांची उपस्थिती राहणार आहे.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी संजय मोरे, बाबाराव विश्वकर्मा, रणजीत गोणारकर, मारुती लुटे, मारोती कदम, माधव कांबळे, प्रा. डॉ. संजय कसाब, प्रा. डॉ. दिलीप कोठोडे, नागोराव डोंगरे आदी परिश्रम घेत आहेत.

## निषाद संगीत विद्यालयाचे शनिवारी प्रमाणपत्र वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील निषाद संगीत विद्यालयालून अखिल भारतीय गांधर्व संगीत महाविद्यालय मंडलच्या सांगितीक अभ्यासक्रमाच्या विविध परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रमाणपत्रे वितरित करण्याचा कार्यक्रम शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे.

येथील देवकृपा लॉन्समध्ये सायंकाळी ६ वाजता सुरु होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अनिकेत कुलकर्णी राहणार आहेत. मधुकर टाक बैंगनकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक पडघण आणि सतीश मुधोळकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती निषाद संगीत विद्यालयाचे संचालक सुशांत पांडे यांनी दिली.

प्रमाणपत्र वितरणानंतर होणाऱ्या संगीताच्या ट्रॅक शोमध्ये स्वरा टेकाळे, आराध्या कोपलवार, माधुरी देशमुख, दासगुरु जोशी, सुरखदा जोइक, अंजली जोशी, डॉ. गौतम इनवते यांच्यासह २३ कलाकार मावगीते सादर करणार आहेत.

# मातंग समाज व सामाजिक संघटनांची शिखर बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** – मातंग समाज व सामाजिक संघटनांची शिखर बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती आरक्षणाचे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार व निर्देशानुसार उपवर्गीकरण करण्याबाबतचा प्रारूप आराखडा शासनास सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती अनंत बदर समितीने आपला अहवाल शासनास दि. १६ मार्च २०२६ रोजी सादर केला आहे व शासनाने तो अहवाल स्वीकारलेला असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले.

न्या. बदर समितीचा अहवाल अधिक काळ शासनाने प्रलंबित न ठेवता आरक्षण लाभ वंचित जात समूहांना सामाजिक न्याय प्रदान करण्यासाठी इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातही अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण लागू करावे, तसा कायदा पारीत करावा, या विषयाकडे मुख्यमंत्री व राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नव्हे तर शासनास भाग पाडण्यासाठी आता महाराष्ट्रात मातंग समाज व तत्सम वंचित जात समुहाकडून आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, याबाबत आरक्षण लाभ वंचित जात समूहाच्या भावना तीव्र असून त्यासाठी आपला संघर्ष तीव्र करण्याचा निर्धार या समूहाकडून या बैठकीत करण्यात आला आहे.

या मागणीसाठी नांदेड जिल्ह्यातील मातंग समाज व मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनांच्या वतीने दि. ७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे एक दिवसीय प्रचंड धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी दि. ३१ मार्च रोजी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे समाजाचे ज्येष्ठ नेते माजी आ. अविनाश घाटे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस केशव शेकापूरकर, शिवा कांबळे, सतीश कावडे, परमेश्वर बंडेवार, लालबाजी घाटे, गणेश तादलापूरकर, पंडित वाघमारे, निलेश तादलापूरकर, शिवाजी नुरूंदे, नागेश तादलापूरकर, डॉ. माधवराव लोकडे, ॲड. एस. एम. गारे, प्रा. डॉ. विठ्ठल भंडारे, डॉ. हरी बोयाळे, बालाजी जामकर, रामराव सूर्यवंशी, प्रा. देवीदास इंगळे, प्रा. जी.एल. सूर्यवंशी, प्रा. शंकर गड्डमवार, प्रा. नागनाथ मनुरे, शामराव झुंजारे, भुजंग गायकवाड, रामभाऊ देवकांबळे, माधव वाघमारे, एन.जी. पोतरे, नामदेव कांबळे, प्रेमानंद शिंदे, आनंदराव देगावकर, चंद्रकांत भोसीकर, कोंडिबा जाधव, कॉ. इरवंत सूर्यकार, यशपाल गवाले, जी.आर. सूर्यवंशी, डॉ. बालाजी पेनूरकर, बालाजी थोटवे, संजय मोरे, प्रा. पी. एन. कोतेवार, सचिन दाढेल, गोपाळ वाघमारे, गणपत घाटे, उत्तमराव वाघमारे, सोनू दरेगावकर, एच. पी. बोरगावकर, अमित जाधव आदींसह असंख्य कार्यकते उपस्थित होते.

# विष्णुपुरी येथे वाचनालयातर्फे जि. प. शाळेतील गुणवंतांचा सत्कार




**नांदेड (प्रतिनिधी)** – विष्णुपुरी येथील कै. किशनराव टिकाराम देशमुख सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांत वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून जि. प. शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विष्णुपुरी येथील जि. प. शाळेतील माजी विद्यार्थी निवृत्त पीएसआय माणिक हंबर्डे यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना फुले आणि ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विजेंद्र कांबळे, ऋषिकेश राजेंद्र पाटील, आस्मा मुबारक शेख, वेदांत वामन हंबर्डे, भक्ती नागोराव पांचाळ, समृद्धी सुरेश गाजरे, अक्षरा काळेश्वर हंबर्डे, अस्मिता भास्कर कंठाळे, वेदिका वामन हंबर्डे, संजीवनी राजेंद्र पाटील, गौरव गणेश माने, नेहा विनय पवार, अमित गजानन कऱ्हाळे, मृण्मयी रामदास पांचाळ, आराध्या हंबर्डे, अथर्व सुरेश मुसळे, अनुष्का हंबर्डे आदींचा समावेश होता.

यावेळी व्यासपीठावर शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला जाधव, वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. गोविंद हंबर्डे, पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे आदींची उपस्थिती होती. शाळेतर्फे उपस्थितांचा शाल, श्रीफळ व फुले देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी शिक्षक संतोष देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पाहुण्यांची ओळख करून दिली. माणिक हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून मिळालेली स्वतःची आणि मित्रांची सर्व पुस्तके वाचून चांगले यश मिळविण्याचा सल्ला दिला.

डॉ. गोविंद हंबर्डे यांनी दहावी, बारावीनंतर कोणकोणते अभ्यासक्रम उपलब्ध आहेत याची विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक एम. ए. खदीर यांनी केले तर मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव यांनी उपस्थिताचे आभार मानले.

## नांदेड विभागातील नाईट पेट्रोलमन यांना इम्प्लोयी ऑफ द मंथ पुरस्कार प्रदान



**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले परमेश्वर सरगध, नाईट पेट्रोलमन (ट्रॅक मेंटेनर-खत/नवलगाव) यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल फेब्रुवारी २०२६ महिन्यासाठी मुख्यालय स्तरावर दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्याकडून प्रतिष्ठित Employee of the Month (महिन्याचा सर्वोत्तम कर्मचारी) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

दि. ७ मार्च २०२६ रोजी पूर्णा-अकोला विभागातील माळसेलू-नवलगाव सेक्शनमध्ये रात्री गस्त घालत असताना त्यांनी दाखविलेल्या सतर्कता व कर्तव्यनिष्ठेच्या पार्श्वभूमीवर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. गस्तीदरम्यान पहाटे ०५:३१ वाजता, ओएचई मास्ट क्रमांक ८६०/१५-१६ जवळ रेल्वे रुळाच्या वेल्डमध्ये तडे गेलेले असल्याचे परमेश्वर सरगध यांच्या निदर्शनास आले, ज्यामुळे रेल्वे वाहतुकीस गंभीर धोका निर्माण होऊ शकला असता.

तत्काळ प्रसंगावधान दाखवत त्यांनी रेल्वेच्या सुरक्षा नियमांनुसार संबंधित ठिकाणी दोन्ही बाजूंना हँड सिग्नल व डेटोनेटर ठेवून ट्रॅकचे संरक्षण केले आणि येणाऱ्या गाड्यांना इशारा दिला. तसेच त्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली.

# आई-वडिलांच्या पुण्याईमुळे मुले चांगली निघतात –हभप गजानन महाराज पवार खरबीकर

**लोहा (प्रतिनिधी)** –आई, वडिलांच्या पुण्याईमुळे मुले चांगली निघतात, असे प्रतिपादन हभप गजानन महाराज पवार खरबीकर यांनी केले. लोहा तालुक्यातील पारडी येथे कै. सोपानराव पाटील डिकळे यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित हरिकिर्तनात ते बोलत होते.




संत मोतीराम महाराज यांचे भक्त वारकरी सांप्रदायिक कै. सोपानराव पाटील डिकळे यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त पारडी येथे हभप गजानन महाराज पवार खरबीकर यांच्या हरिकीर्तनाचे व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कै. सोपानराव पाटील डिकळे यांचे पुत्र मुक्तिराम सोपानराव पाटील डिकळे, बाजीराव सोपानराव पाटील डिकळे, सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता श्रीराम सोपानराव पाटील डिकळे, दीपक पाटील डिकळे, तसेच सरपंच गोविंदराव पाटील डिकळे, माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळे, माजी सदस्य बाबुराव गायकवाड, ग्रा. पं. सदस्य व्यंकटराव मोरवले, संदीप डिकळे, जगन्नाथ डिकळे, मारोतीअप्पा मटके, दशरथ डिकळे, राजू पवार, विठ्ठल पवार, त्र्यंबक डिकळे, दत्ता डिकळे, विश्वंभर डिकळे, तातेराव पाटील डिकळे, रामचंद्रअप्पा मटके यांच्यासह गावकरी मंडळी उपस्थित होती.

यावेळी हभप गजानन महाराज पवार खरबीकर यांनी कै. सोपानराव पाटील डिकळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त हरिकीर्तनातून समाज प्रबोधन केले. विठ्ठल -विठ्ठल जय हरी विठ्ठल ज्ञानदेव तुकाराम महाराज यांचा जयघोष करीत अनेक उदाहरणे दिली.

CMYK

# अंतर्मन




## 'लाल किताब'मधील उपाय अवलंबा, ग्रहांच्या प्रतिकूल परिणामांना दूर ठेवा!

**जर तुमच्या कुंडलीतील एखाद्या ग्रहाची स्थिती अनुकूल नसेल आणि त्याचा जीवनावर प्रतिकूल परिणाम होत असेल तर त्या व्यक्तीला त्यांच्या कामात आणि जीवनात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. कमजोर सूर्य ग्रहामुळे मानहानी आणि आत्मविश्वासाची कमतरता येऊ शकते. कमजोर गुरू ग्रहामुळे विवाहात अडथळे आणि आर्थिक अडचणी येऊ शकतात. त्याचप्रमाणे, प्रत्येक ग्रहाचा जीवनावर वेगवेगळा प्रभाव असतो. यासाठी लाल किताबमध्ये (Lal Kitab) उपाय आणि त्यांची अंमलबजावणी दिली आहे, जे कुंडलीतील ग्रहांची स्थिती मजबूत करण्यासाठी उपयुक्त ठरतात. ज्योतिषशास्त्रानुसार, लाल किताबमधील उपाय प्रभावी मानले जातात आणि ते जीवनात ग्रहांची अनुकूल स्थिती टिकवून ठेवतात. चला, ग्रहांची स्थिती मजबूत करण्यासाठी लाल किताबमधील सोप्या उपायांबद्दल सविस्तर जाणून घेऊया...**

» सूर्य ग्रहाला मजबूत करण्याचा उपाय : जर कुंडलीत सूर्याची स्थिती कमजोर असेल, तर व्यक्तीला आदर आणि आत्मविश्वासाची हानी होऊ शकते. याव्यतिरिक्त, सरकारी कामात अडथळे येऊ शकतात. लाल किताबनुसार, सूर्याची स्थिती मजबूत करण्यासाठी रविवारी वाहत्या पाण्यात गुपचूप गूळ टाकावा. हे नियमितपणे केल्याने व्यक्तीला फायदा होऊ शकतो आणि जीवनात सूर्याची कृपा टिकून राहते.

» चंद्राला बलवान करण्याचा उपाय : जर कुंडलीत चंद्राची स्थिती कमजोर असेल, तर व्यक्तीला मानसिक ताण आणि निर्णय घेण्यातील अडचणी यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत चंद्राला बलवान करण्यासाठी आणि या समस्या दूर करण्यासाठी लाल किताबमधील उपायाचा वापर केला जाऊ शकतो. डोक्याशी दुधाचे किंवा पाण्याचे भांडे ठेवून झोपावे. मग, दुसऱ्या दिवशी सकाळी, ते पाणी किंवा दूध बाभळीच्या झाडाला अर्पण करावे.

» मंगळाची स्थिती बलवान करण्याचा उपाय : ज्योतिषशास्त्रानुसार, कुंडलीतील मंगळाच्या कमजोर स्थितीमुळे धैर्य आणि ऊर्जेत घट होऊ शकते. वैवाहिक जीवनातही समस्या निर्माण होऊ शकतात. मंगळाला बलवान करण्यासाठी गोड पदार्थ किंवा मिठाई दान करण्याचा उपयोग केला जाऊ शकतो. याव्यतिरिक्त, लाल किताबनुसार, मंगळाचे नकारात्मक परिणाम दूर करण्यासाठी मिठाई पाण्यात टाकावी. या उपायामुळे शुभ परिणाम मिळू शकतात.

» बुधाची स्थिती मजबूत करण्याचा उपाय : जर कुंडलीत बुध कमजोर असेल, तर त्या व्यक्तीला एकाग्रतेचा अभाव, निर्णय घेण्यास अडचण इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागू शकते. याचा परिणाम व्यवसायावरही होऊ शकतो. लाल किताबनुसार, बुधाला मजबूत करण्यासाठी तांब्याचा तुकडा किंवा नाणे घेऊन त्याला छिद्र पाडावे आणि वाहत्या पाण्यात फेकून द्यावे. हा उपाय जीवनात बुधाचा अनुकूल प्रभाव टिकवून ठेवतो.

» गुरूची स्थिती मजबूत करण्याचा उपाय : ज्योतिषशास्त्रानुसार, गुरू ग्रहाला ज्ञान, संपत्ती, विवाह, भाग्य, संतती इत्यादींचा घटक मानले जाते. त्यामुळे, जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत गुरूची स्थिती कमजोर असेल, तर त्यांना विवाह, संपत्ती इत्यादींशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागू शकते. लाल किताबनुसार, गुरूची अनुकूलता मिळवण्यासाठी नाभीला केशर लावण्याचा सल्ला दिला जातो. याव्यतिरिक्त आपण केशराचे सेवन करू शकता. हा उपाय शुभ परिणाम देऊ शकतो.

» शुक्राची स्थिती मजबूत करण्याचा उपाय : जर तुमच्या कुंडलीत शुक्र कमजोर असेल, तर तुम्हाला सुखसोयींची कमतरता, वैवाहिक आणि प्रेम जीवनात अडचणी, तसेच आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. लाल किताबानुसार, तुमच्या जीवनात शुक्राची कृपा टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही गायी किंवा ज्वारीचे दान करू शकता. असे केल्याने तुमच्या कुंडलीतील शुक्राची स्थिती मजबूत होऊ शकते.

» शनीची स्थिती मजबूत करण्यासाठी उपाय : शनीदेवाला न्यायाचा देव म्हणून ओळखले जाते. जर कुंडलीत शनीची स्थिती चांगली नसेल, तर कठोर परिश्रम करूनही अपेक्षित यश न मिळणे, आर्थिक अडचणी आणि कामातील अडथळे यांसारख्या समस्या तुम्हाला जीवनात त्रास देऊ शकतात. अशा परिस्थितीत, शनीचे प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी तुम्ही शनिवारी एक साधा उपाय करू शकता. यासाठी, तेलाने भरलेले छायापात्र अर्पण करणे फायदेशीर ठरू शकते.

» राहू ग्रहाची स्थिती मजबूत करण्यासाठी उपाय : ज्योतिषशास्त्रानुसार, राहू हा एक छाया ग्रह आहे. जर त्याचा जीवनावर प्रतिकूल परिणाम होत असेल, तर व्यक्तीला आर्थिक समस्या, मानसिक गोंधळ आणि निर्णय घेण्यास अडचण येऊ शकते. अशा परिस्थितीत, राहू ग्रहाचे प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी तुम्ही मुळ्यांचे दान करू शकता. याव्यतिरिक्त, लाल किताबानुसार, तुम्ही वाहत्या नदीत कोळसा देखील सोडू शकता.

» केतू ग्रहाची स्थिती मजबूत करण्याचा उपाय : राहू आणि केतू हे दोन्ही छाया ग्रह आहेत. जर कुंडलीत केतू ग्रह प्रतिकूल असेल, तर त्या व्यक्तीला जीवनात मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. मानसिक ताण आणि चिंता देखील कायम राहू शकते. हा परिणाम कमी करण्यासाठी, तुम्ही कुत्र्याला भाकरी खाऊ घालू शकता. असे केल्याने शुभ परिणाम मिळू शकतात.

### उपाय करताना या गोष्टी लक्षात ठेवा...

लाल किताबानुसार, जीवनातील अनुकूल ग्रहस्थितीसाठी हे उपाय अत्यंत प्रभावी ठरू शकतात. तथापि, ते सलग ४० ते ४३ दिवस केले पाहिजेत. ते आठवड्याच्या दिवसानुसार केले जाऊ शकतात. तथापि, ते सलग ४० किंवा ४३ वेळा करणे आवश्यक मानले जाते. जर उपाय चुकला किंवा काही कारणास्तव तुम्ही तो करू शकत नसाल, तर तांदूळ दुधाने धुवून आपल्याजवळ ठेवा. असे मानले जाते की असे केल्याने आधीचा उपाय अमान्य होत नाही. जर तुम्ही शेवटच्या वेळी, म्हणजेच ३९ व्या किंवा ४० व्या दिवशी, उपाय केला नाही, तर तो निष्प्रभ ठरू शकतो. लाल किताबनुसार, अशा परिस्थितीत तो उपाय पुन्हा सुरू केला पाहिजे.

**टीप :** ज्योतिषशास्त्रामध्ये लाल किताब अत्यंत प्रभावी मानला जातो. असे मानले जाते की त्यातील उपायांचे योग्य पालन केल्यास शुभ परिणाम मिळतात. वर उल्लेखलेल्या ग्रहांसाठीचे उपाय हे लाल किताबमध्ये वर्णन केलेले आहेत. आम्ही त्यांच्याबद्दल कोणताही दावा करत नाही.

## परशुराम जयंती, अक्षयतृतीया...

# एप्रिलमधील प्रमुख सण, उत्सवाची यादी...

**एप्रिल महिन्यात २ एप्रिलला हनुमान जयंती साजरी झाली. या महिन्यात परशुराम जयंती, वैशाखी, अक्षय तृतीया असे अनेक प्रमुख सण साजरे केले जातील. जे हिंदू धर्मात अत्यंत शुभ मानले जातात. याव्यतिरिक्त मोहिनी एकादशीचे व्रतदेखील पाळले जाईल...**

### प्रमुख सण, उत्सव

» वरुथिनी एकादशी : १३ एप्रिल
» वैशाखी (बैसाखी) : १४ एप्रिल
» बुध प्रदोष व्रत : १५ एप्रिल
» परशुराम जयंती : १९ एप्रिल
» अक्षय्य तृतीया : १९ एप्रिल
» गंगा सप्तमी : २३ एप्रिल
» बगलामुखी जयंती : २४ एप्रिल
» सीता नवमी : २५ एप्रिल
» मोहिनी एकादशी : २७ एप्रिल
» भौम प्रदोष व्रत : २८ एप्रिल
» नृसिंह जयंती : ३० एप्रिल



» वरुथिनी एकादशी : वैशाख महिन्याच्या कृष्ण पक्षातील एकादशीला वरुथिनी एकादशी म्हणतात. पद्म पुराणात या एकादशीचे विशेष महत्त्व सांगितले आहे. असे मानले जाते की हे व्रत पाळल्याने पापांचा नाश होतो आणि अत्यंत शुभ फळे मिळतात.

» वैशाखी : या दिवशी सूर्य मेष राशीत प्रवेश करतो. हा सण शेतकऱ्यांसाठी एक अतिशय विशेष आहे. या दिवशी शेतकरी चांगल्या पिकाबद्दल देवाचे आभार मानतात. वैशाखीच्या दिवशी घरे स्वच्छ करून सजवली जातात आणि विविध पदार्थ बनवण्याचीही परंपरा आहे.

» बुध प्रदोष व्रत : प्रदोष व्रत बुधवारी येत असल्याने त्याला बुध प्रदोष व्रत म्हणतात. या दिवशी भगवान शिवाची पूजा केली जाते आणि विधीपूर्वक उपवास केला जातो. शिवाय प्रदोष काळात पूजा करणे हे प्रदोष व्रतादरम्यान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

» परशुराम जयंती : परशुराम जयंती वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तिसऱ्या दिवशी साजरी केली जाते. असे मानले जाते की, भगवान विष्णूचा सहावे अवतार परशुराम प्रदोष काळात अवतरले होता. पृथ्वीवरील पापी राजांचा नाश करण्यासाठी त्यांनी अवतार घेतला होता.

» अक्षय तृतीया : अक्षय तृतीयेचा सण वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तिसऱ्या दिवशी साजरा केला जातो. धर्मग्रंथांमध्ये या दिवसाचे वर्णन युगादी तिथी असे केले आहे, म्हणजेच नवीन युगाच्या प्रारंभाचा दिवस. या दिवशी कोणत्याही शुभ मुहूर्तावर सोने, मालमत्ता इत्यादी खरेदी करणे शुभ मानले जाते.

» गंगा सप्तमी : गंगा सप्तमीचा सण वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या सातव्या दिवशी येतो. असे मानले जाते की याच दिवशी गंगा माता प्रकट झाली होती. त्यामुळे या दिवशी गंगा नदीत स्नान करण्याला विशेष महत्त्व आहे.

» बगलामुखी जयंती : देवी बगलामुखीला दहा महाविद्यांपैकी आठवी महाविद्या मानले जाते. देवीचे हे रूप तंत्र आणि स्तंभशक्ती म्हणून ओळखले जाते. असे मानले जाते की वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या आठव्या दिवशी बगलामुखी माता प्रकट झाली होती. देवीच्या या रूपाची पूजा केल्याने अत्यंत शुभ फळे मिळतात.

» सीता नवमी : दरवर्षी सीता नवमी वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवशी येते. असे मानले जाते की माता सीता याच दिवशी प्रकट झाल्या होत्या. अशा परिस्थितीत देवीची पूजा केल्याने उत्तम फळ मिळते.

» मोहिनी एकादशी : मोहिनी एकादशी वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला पाळली जाते. असे मानले जाते की या दिवशी भगवान विष्णूची पूजा केल्याने आशीर्वाद मिळतात.

» भौम प्रदोष व्रत : प्रदोष व्रत प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्ष आणि कृष्ण पक्षातील त्रयोदशीला पाळले जाते. जेव्हा प्रदोष व्रत मंगळवारी येते, तेव्हा त्याला भौम प्रदोष व्रत म्हणतात. या दिवशी भगवान शिवासोबत भगवान हनुमानाची पूजा करणे अत्यंत शुभ मानले जाते.

» नृसिंह जयंती : नृसिंह जयंती वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्दशीला साजरी केली जाते. अशी आख्यायिका आहे की, याच दिवशी भगवान विष्णूचा चौथा अवतार असलेले नरसिंह, भक्त प्रल्हादाच्या प्रार्थनेला प्रतिसाद देण्यासाठी आणि हिरण्यकशिपूचा वध करण्यासाठी प्रकट झाले होते. या दिवशी भगवान नरसिंहाची पूजा केल्याने आणि रात्रभर जागल्याने विशेष लाभ मिळतो.

# रात्री कपडे धुवावेत का?

## कोणती वेळ सर्वोत्तम? वास्तुशास्त्र काय सांगते...

**रात्री कपडे धुवावेत का? धावपळीच्या जीवनात, लोक सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्यस्त असतात. ऑफिस आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये वेळेचे नियोजन करणे कठीण होते. त्यामुळे, बरेच लोक रात्री कपडे धुणे पसंत करतात. वास्तुशास्त्रानुसार, रात्री कपडे धुणे अशुभ मानले जाते. असे केल्याने घरातील ऊर्जेवर परिणाम होतो आणि सुख व समृद्धीवर परिणाम होतो.**

» वास्तुशास्त्र काय सांगते? : वास्तुशास्त्रानुसार, रात्रीची वेळ नकारात्मक ऊर्जेची वेळ मानली जाते. या काळात, वातावरणात नकारात्मक शक्ती अधिक सक्रिय असतात. या वेळी कपडे धुणे आणि वाळवणे नकारात्मक ऊर्जेवर परिणाम करते आणि वापरकर्त्याला समस्या निर्माण करते. म्हणून, दिवसा कपडे धुणे अधिक शुभ मानले जाते.

» रात्री कपडे धुण्याचे तोटे? : सूर्यास्तानंतर कपडे धुणे आणि ते उघड्यावर वाळवणे हा वास्तू दोष मानला जातो. याचा घराच्या समृद्धीवर नकारात्मक परिणाम होतो. यामुळे अचानक आर्थिक नुकसान आणि मानसिक अस्वस्थता येऊ शकते. रात्री जास्त आर्द्रता असते, ज्यामुळे कपडे पूर्णपणे सुकत नाहीत. यामुळे जंतू आणि बुरशी वाढण्याची शक्यताही वाढते, ज्यामुळे त्वचेचे आजार होऊ शकतात. अशा परिस्थितीत, सूर्यास्तानंतर उघड्यावर कपडे धुणे आणि वाळवणे टाळणे तुमच्यासाठी चांगले राहील.

» कपडे धुण्यासाठी सर्वोत्तम वेळ कोणती? : वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्रानुसार, कपडे धुण्यासाठी आणि वाळवण्यासाठी दिवसाची वेळ सर्वोत्तम मानली जाते. सकाळचे वातावरण अधिक सकारात्मक असते. सूर्यप्रकाश कपड्यांना शुद्ध आणि ऊर्जावान बनवतो, ज्याचा त्यांच्यावर सकारात्मक परिणाम होतो. दिवसा वाळवलेल्या कपड्यांवर जीवाणू आणि जंतूंचा प्रादुर्भाव होण्याची शक्यताही कमी असते.





# 'या' सोप्या नियमांचे पालन केल्याने मिळतात व्रत, उपवासाचे पूर्ण लाभ

**नियमितपणे व्रत केल्याने व्यक्तीला जीवनात अनेक ऐहिक आणि आध्यात्मिक लाभ व अनुभव मिळतात. शिवाय व्यक्ती ज्या समस्येशी झगडत असतो ती समस्या एकतर नाहीशी होते किंवा त्या समस्येशी लढण्याचे बळ मिळते. ज्यामुळे सहजपणे त्या समस्येचा सामना करता येतो. व्रतामुळे आत्मा, बुद्धी आणि विचार शुद्ध होतात आणि दृढनिश्चय वाढतो. म्हणून, नियमितपणे व्रत केले पाहिजे.**

### व्रताचे नियम

» निश्चयाशिवाय व्रत अपूर्ण असते. व्रत सुरू करण्यापूर्वी, एखाद्या विशिष्ट कार्यासाठी किती वेळा आणि किती काळासाठी व्रत करायचे, याचा निश्चय करावा.

» व्रताच्या दिवशी आपल्या देवांसोबतच पूर्वजांचे स्मरण केले पाहिजे. यामुळे देव तसेच पूर्वजांचा आशीर्वाद मिळतो आणि ज्या कार्यासाठी व्रत केले जाते ते कार्य लवकर पूर्ण होते.

» व्रत शुभ मुहूर्तावर सुरू करा. जेणेकरून ते कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्ण होऊ शकेल.

» व्रताच्या दिवशी राग, निंदा करणे टाळा. ब्रह्मचर्याचे पालन करा.

» व्रताच्या दिवशी देवाची पूजा केल्यानंतर, वडीलधाऱ्या व्यक्ती, आई-वडील आणि शिक्षकांच्या चरणांना स्पर्श करून त्यांचे आशीर्वाद घ्या.

» तुम्ही जे काही व्रत कराल, ते शास्त्र आणि पुराणांमध्ये सांगितलेल्या विधींनुसारच करा. तुमच्या सोयीनुसार त्यात बदल करू नका.

» व्रतादरम्यान कुटुंबात जन्म किंवा मृत्यू झाल्यास सुतक लागते. अशा परिस्थितीत आपल्या भटजींचा सल्ला घेऊन व्रत पुन्हा सुरू करावे.

» व्रत पूर्ण झाल्यावर, शास्त्रानुसार आहुती देऊन तो पूर्ण करावा. कारण आहुती न दिल्यास व्रत फायदे नाहीसे होतात.

» वास्तविक पाहता, व्रत म्हणजे उपाशी राहणे नव्हे, तर आहारात संयम ठेवणे होय. म्हणून, शरीर हलके ठेवण्यासाठी व्रताच्या दिवशी फक्त सात्विक अन्न खावे. शिळे, जड, तळलेले पदार्थ, कांदा, लसूण इत्यादी असलेले पदार्थ टाळावेत.

» व्रत करणाऱ्या स्त्रीला उपवासादरम्यान मासिक पाळी आल्यास तिने त्या दिवसाचे व्रत करू नयेत. अशा परिस्थितीत तिने व्रत करावे, पण पूजा करू नये.

» चुकीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे व्रत मोडल्यास किंवा चुकल्यास माफी मागून पुन्हा व्रत सुरू करावे.

» कोणत्याही व्रतासाठी क्षमा, सत्य, दया, दान, ईश्वरभक्ती, अग्निहवन, समाधान इत्यादींचे पालन करणे अनिवार्य आहे. उपवासाच्या दिवशी शास्त्राविरुद्ध कोणतेही कृत्य केल्यास, प्रथम प्रायश्चित्त करून मग व्रत सुरू करावे.

» व्रताच्या दिवशी गोड शब्दांचा वापर करावा, खोटे बोलू नये. ईश्वराचे स्मरण करून कल्याणकारी वृत्तीचे पालन करावे.

# 'या' तत्त्वांचा अवलंब केल्याने अडचणी होतात दूर

**सुज्ञ लोक म्हणतात, जे घडत आहे त्यात अडकू नका; ते जसे आहे तसे पाहा. तुमच्या हस्तक्षेपाने काहीही बदलणार नाही. दुर्योधनाला नारद मुनी आणि श्रीकृष्णाने उपदेश केला होता, पण त्याच्या अहंकाराने सर्वकाही नष्ट केले. आपले जीवन महाभारतातील कुरुक्षेत्राच्या युद्धासारखे आहे, जिथे विजयासाठी काही प्रमुख तत्त्वांचा अवलंब करणे महत्त्वाचे आहे...**

हे जग एका महासागरासारखे आहे; प्रत्येक लाट स्वतःच्या गतीने पुढे जाते; कोणी प्रयत्न करूनही तिला थांबवू शकत नाही. जीवनाचा खेळ असाच चालू राहतो. दुःखाला घाबरू नका, सुखाने वेडे होऊ नका. या दोन्ही अवस्था बाह्य आहेत, कारण जीवन एक नाटक आहे. नियती आपल्याला कठपुतळीसारखे नाचवते, पण तिच्या दोऱ्या कोणालाच दिसत नाहीत. जेव्हा तिच्या हालचालीत अडथळा येतो, तेव्हाच विघटन होते. जर आपण थोर आणि ज्ञानी पुरुषांवर विश्वास ठेवला, तर आज जीवनात आपण जे काही पाहतो ते आपलीच देणगी आहे. थोर पुरुषांनी गुरुमंत्र दिला आहे की जीवन हे देण्यासाठी आहे, घेण्यासाठी नाही. जर आपण या मंत्राला आपला जीवनसाथी बनवले, तर आपण अनेक घटना टाळू शकतो. एक छोटा शत्रू नेहमी आपला पाठलाग करतोः मत्सर; आपण त्याच्या सावलीपासून स्वतःचे रक्षण करायला शिकले पाहिजे. जेव्हा आपल्याला सतत देण्याची नव्हे, तर घेण्याची इच्छा सतावते, तेव्हा जीवन दुःखमय होते. जे लोक जीवनातील मोहमायेच्या जाळ्यात अडकतात, त्यांना केवळ दुःख आणि अशांतीचा अनुभव येतो. आनंद कधीही कायमचा नसतो; परिस्थिती प्रत्येकाच्या आयुष्यात येते, पण काही जण असे असतात ज्यांच्यावर तिचा परिणाम होत नाही. णसाने जीवनातील प्रत्येक क्षणाकडे एका प्रेक्षकाच्या नजरेने पाहायला शिकले पाहिजे. प्रत्येकाला सुखसोयीचे आणि ऐषारामाचे जीवन आवडते. आपली ध्येये साध्य करण्याच्या प्रयत्नात असताना, त्यांचा चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या लोकांशी संपर्क येतो. जे आपल्याबद्दल वाईट बोलतात किंवा आपल्याला इजा पोहोचवण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्यापासून दूर राहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आपल्या आत असलेल्या विश्वाच्या अनंत शक्यतांचा शोध घ्या.

# मंत्रालय प्रवेशासाठी लागणारी १० हजार ओळखपत्रे गायब

**मुंबई (प्रतिनिधी)** – मंत्रालयातील प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'डिजी प्रवेश' प्रणालीतील १० हजार ओळखपत्रे अभ्यागतांनी परत न केल्याची माहिती समोर आली आहे. नियमानुसार प्रवेश संपल्यानंतर ही कार्डे जमा करणे आवश्यक असते; मात्र १० हजार कार्डे मंत्रालयाबाहेर गेल्याने आता प्रशासनाने ती परत मिळवण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आपली कामे घेऊन मंत्रालयात येत असतात. त्यांना जलद प्रवेश मिळावा यासाठी अत्याधुनिक 'डीजी ॲप'च्या माध्यमातून डिजिटल ओळखपत्रे वितरित केली जातात. मात्र, ही ओळखपत्रे घरी घेऊन जाणाऱ्यांची संख्या वाढल्याने आता कंत्राटदार कंपनीने तांत्रिक डेटाच्या आधारे अशा व्यक्तींशी संपर्क साधणे सुरू केले आहे.

ज्या अभ्यागतांकडे ओळखपत्रे राहिली आहेत, त्यांना थेट फोन करून कार्ड परत करण्याची विनंती केली जात आहे. अभ्यागत कोणत्या कामासाठी आले होते आणि त्यांचा संपर्क क्रमांक काय, याची संपूर्ण नोंद संगणकीय प्रणालीत उपलब्ध असल्याने संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचणे प्रशासनाला सोपे झाले आहे. विशेष म्हणजे, या संवाद प्रक्रियेला नागरिकांकडूनही प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत सुमारे ३०० कार्ड्स परत जमा करण्यात आली आहेत.

## टी.सी. हरवली

माझी आवलवार लक्ष्मीकांत सुभाष डिप्लोमा सिव्हिल पासची टी.सी. जळकोट ते नांदेड दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. ज्याना कोणास सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता - आवलवार लक्ष्मीकांत सुभाष रा. सिंचन नगर मालेगाव रोड नांदेड ता. जि. नांदेड मो. ९५६१२८०६५४

## Change In Name

My Old Name is **Rajendraji Rameshwar Kabra** which now I am changing as New Name **Rajendra Rameshwar Kabra.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Rajendra Rameshwar Kabra H.No. 2-12-336, Flat No. 5, Ashwini Apparment, Banda Ghat Road, Vizarabad, Near P.N. College Nanded.**

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा (खु.) ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ९५ मधील शिवराय पार्क शिवराय नगर मधील प्लॉट नं. १/८ साईज ३० बाय ६० ज्याचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे १८०० चौ.फुटाचा प्लॉट निझार निरुद्दीन लालाणी यांच्याकडून सौ. वैशाली अनिल उबाळे रा. सिद्धार्थ नगर, तरोडा (बु.) नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा- पूर्वेस - प्लॉट नं. १/७, पश्चिमेस - २० फुटाचा रूंद रोड, दक्षिणेस - गट क्र. १९ चा भाग व उत्तरेस - ३० फुटाचा रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत सौ. वैशाली अनिल उबाळे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करिता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**सौ. वैशाली अनिल उबाळे**
**रा. सिद्धार्थ नगर, तरोडा (बु.) नांदेड**
**मो.नं. ९५८८६११४४२, ९४२२१८८०८५**

## जाहिर प्रगटण

ज्या अर्थी माझे पक्षकार नामे १) श्री निखिल पि.माधवराव दुरनाळे वय ३८ वर्षे धंदा नौकरी २) श्री गणेश पि.माधवराव दुरनाळे वय ३५ वर्षे दोघे रा.होनवडज ता.मुखेड जि.नांदेड यांनी मौ.अटकळी ता.बिलोली ग्रामपंचायत हद्दीतील श्री सुघोष पि.अरुण अटकळीकर रा.अटकळी ता.बिलोली हा.मु.संभाजी नगर नांदेड यांचे नावे असलेले शेत गट क्रं. १३० एकुण क्षे. ०६ हे.६० आर पैकी त्यांचे नावे व मालकी ताबेतील क्षे. ०२ हे.२० आर ज्याची चर्तु:सिमा **पुर्वेस**- सय्यद सत्तार पि.कासीमसाब व सय्यद आयुब पि.अहमदसाब **पश्चिमेस**- झुल्लाबाई भ्र.भुमा बत्तलवाड व लक्ष्मीबाई भ्र.गंगाधर बत्तलवाड **दक्षिण** शोभा गणपत पोलकमवाड **उत्तर**- मानसी अजीत अटकळीकर ही जमीन कायदेशिर रित्या खरेदी करण्याचा करारनामा/ व्यवहार श्री सुघोष पि.अरुण अटकळीकर यांचे सोबत केला असुन तसे सौदाचिठ्ठी माझे पक्षकारांनी त्यांचे हक्कात दि.३०.०३.२०२६ रोजी सुघोष अटकळीकर यांचेकडून लिहून घेतले असुन सदर खरेदी जमीनीचे खरेदीखत दि.३१.०५.२०२६ चे पुर्वी किंवा सदर तारखेपर्यंत करण्याचे ठराव केला आहे. आणि बयाना रक्कम रु.१०,००,०००/- अक्षरी दहा लाख रुपये दिले आहे.

तरी माझे पक्षकारानी खरेदी व्यवहार केलेले श्री सुघोष पि.अरुण अटकळीकर यांचे नावे असलेलेले शेत गट क्रं.१३० क्षे ०२ हे.२० आर शेतजमीन विषयी कुणाचे काही हक्क संबंध व अधिकार वारसा आधारे किंवा अन्य मार्गाने असल्यास ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी अथवा स्वत: कागदपत्रासह हजर होऊन आक्षेप व ऊजर कळवावे करीता हे जाहिर प्रगटण आज रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. यांची नोंद घ्यावी.

नोट : - नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तर्फे
ॲड शिवकुमार एन.पाटील
Adv. Shivakumar N. Patil
न्यायालय बिलोली B.Sc., LL.B.
Cell 9657582997-839052815

जाहिर प्रगटण देणार
१) निखिल पि.माधवराव दुरनाळे
२) गणेश पि.माधवराव दुरनाळे

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की खालील प्लॉट धारक यांनी सहकारी ज्ञानेश्वर गृहनिर्मान संस्था गावठाण , वाडी बुद्रुक तालुका जिल्हा नांदेड. व ग्रामपंचायत कार्यालय वाडी बुद्रुक यांच्याकडे खालील सर्व प्लॉट धारकांनी कागदपत्राद्वारे व शपथपत्राद्वारे लिहून दिले आहे व ते त्या प्लॉटवर कब्जेदार आहेत. त्यांनी सोसायटी व ग्रामपंचायतला पत्राद्वारे नमुना नं ८ साठी विनंती केली आहे. तरी या प्लॉट विषयी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत ग्रामपंचायतला कागदपत्राद्वारे लेखी आक्षेप नोंदवावा. सात दिवसानंतर ग्रामपंचायतला कोणाचाही आक्षेप आला नाही तर खालील सर्व प्लॉट धारकांना नमुना नंबर आठ देण्यात येईल.

खालील प्लॉट धारकांची नावे...

| नाव | प्लॉट साइज |
|---|---|
| १) लक्ष्मण नारायण कोकणे | ३० x ४० = १२०० चौरस फूट |
| २) प्रीती अशोक मुक्कावार | ३० x ४० = १२०० चौरस फूट |
| ३) संतोष रमेश सोनटक्के | ३० x ४० = १२०० चौरस फूट |
| ४) आहिल्याबाई जयराम आलुरे | ३० x ४० = १२०० चौरस फूट |


# आभार ! आभार !! आभार !!!

आपली माणसं आपली बँक

## शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड

### दि.३१ मार्च २०२६ रोजीची आर्थिक स्थिती

(रक्कम रु. कोटीत)

| | |
|---|---|
| एकुण व्यवसाय- | ४००.०० |
| वसुल भाग भांडवल- | ७.४९ |
| ठेवी- | २५२.०१ |
| कर्ज वाटप- | १४७.८१ |
| नफा- | १.६० |
| गुंतवणूक- | ११२.७७ |
| Gross NPA- | ५.७१% |
| Net NPA- | १.७०% |
| CD Ratio- | ५७.८५% |

बँकेच्या प्रगती व उन्नतीला बँकेचे सभासद, ग्राहक, ठेवीदार, कर्जदार, थकबाकीदार व हितचिंतक यांनी केलेल्या सहकार्य व विश्वासाबद्दल त्यांचे आभार !

......☆☆☆☆......

! आभारकर्ते !

मा.आ.श्री.ओमप्रकाश पोकर्णा
(सं.अध्यक्ष)

मा.श्री.मधुकरराव देशमुख (उपाध्यक्ष)

श्री.विक्रम राजे (सी.ई.ओ. / एम.डी.)

सर्व संचालक मंडळ, सर्व व्यवस्थापन मंडळ व सर्व कर्मचारी वृंद


## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४२४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. २४४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, पोशट्टी रामा अनगुलवार रा. सवना मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २४४ वार्ड न. १७ दत्तात्रय आत्मारा मुळे व श्याम मधुकरराव रायेवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४५६/२०२६ दि. २३/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – हिमायतनगर पळसपूर रस्ता, पश्चिमेस – प्लॉट क्र. ८ ची जागा, दक्षिणेस –प्लॉट क्र. २ ची जागा, उत्तरेस – प्लॉट क्र. ४ ची जागा

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४४५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० अ मालमत्ता क्र. ११ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सय्यद सलीम सय्यद गफुर रा. हिमायतनगर मोहल्ला मोमीनपूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ११ वार्ड न. १० अ कैलास प्रभाकर गोविंदवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४५४/२०२६ दि. २३/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – न.प. घर नं. १२ ची जागा, पश्चिमेस – न.प. घर नं. १० ची जागा, दक्षिणेस –६ मीटर रस्ता, उत्तरेस – न.प. घर नं. २४ ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## Change In Name

My Old Name is **SHABNA BEGUM** which now I am changing as New Name **SHABANA PARVEEN MOHAMMAD SALEEM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 9-6-919, Rahemat Nagar, Near Golden Bekary, Deloor Naka Itwara Nanded 431604 Mo.No. 9423441734**

## Change In Name

My Old Name is **Nivrattrao Kawthe** which now I am changing as New Name **Nivratirao Kawthe.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - P.No. 14, Aditya Sadan, Wamandada Kardak Nagar, Taroda Bk. Nanded 431605 Maharashtra India Mo.No. 7620578610**

## Change In Name

My old name is **Kamble Santosh Laxman** which now I am changing as new name: **Kamble Santosh Laxmanrao** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address: Mu. Karla TM Po. Ratoli Tq. Naigaon Karla TM. Nanded 431709 Maharashtra India

## Change In Name

My Old Name is **Kawthe Komal Nivrattrao** which now I am changing as New Name **Kawthe Komal Nivratirao.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - P.No. 14, Aditya Sadan, Wamandada Kardak Nagar, Taroda Bk. Nanded 431605 Maharashtra India Mo.No. 7620578610**

## Change In Name

My old name is **SHAIKH IPTEKHAR BABUSAB SHEKH** which now I am changing as new name: **SHAIKH IFTEKHAR BABUSAB** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address: AT. POST. WADGON TQ. MUKHED DIST. NANDED MAHARASHTRA 431715

## Change In Name

My old name is **SHAIKH PASHA** which now I am changing as new name: SHAIKH **PASHA SHAIKH ZAHIRODDIN** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address: H NO. 1-13-32, GALLI NO 2, PEER BURHAN, TARODA BK NANDED-431605

Contact Details: 9423750702

## Change In Name

My old name is **Laxman Mahajan Kamble** which now I am changing as new name: **Kamble Laxmanrao Mahajan** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address: Mu. Karla TM Po. Ratoli Tq. Naigaon Karla TM. Nanded 431709 Maharashtra India

## Change In Name

My old name is **JAWARIYA FIRDOUS** which now I am changing as new name: **JAWERIYA FIRDOSE ABDULLAH** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address: H No 9-7-140, LANE NO. 2, NEAR RAHAT EYE HOSPITAL, HYDER BAGH NO. 1, ITWARA, NANDED, MAHARASHTRA - 431604

Contact Details: 7083358266


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४४३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० अ मालमत्ता क्र. ९९ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, नगमा फातेमा मिर्झा मुजाहिद बेग रा. हिमायतनगर मोहल्ला शिपाही यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ९९ वार्ड न. १० अ गुलमोहम्मद खान नुरोद्दिन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४८५/२०२६ दि. २८/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ४४, पश्चिमेस – कॉलनी रस्ता, दक्षिणेस –प्लॉट नं. ५८ ब, उत्तरेस – कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४४२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० अ मालमत्ता क्र. १०० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख इमरान शेख अनवर रा. हिमायतनगर मोहल्ला नई आबादी यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १०० वार्ड न. १० अ गुलमोहम्मद खान नुरोद्दिन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४८७/२०२६ दि. २८/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ४५, पश्चिमेस – प्लॉट नं. ४३, दक्षिणेस –प्लॉट नं. ५५, उत्तरेस – कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४४१

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० अ मालमत्ता क्र. १०१/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख जावीद शेख महेमुद रा. हिमायतनगर मोहल्ला कालिका गल्ली यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १०१/१ वार्ड न. १० अ गुलमोहम्मद खान नुरोद्दिन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४८३/२०२६ दि. २८/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ४७, पश्चिमेस – प्लॉट नं. ४५, दक्षिणेस –प्लॉट नं. ५३, उत्तरेस – कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३६

नाव परिवर्तन वार्ड क्र. ११ मालमत्ता क्र. १३० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सौ. शोभा गौतम भवरे रा. हिमायतनगर मोहल्ला आंबेडकर चौक यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १३० वार्ड न. ११ गौतम बळीराम भवरे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५४६३/२०२६ दि. २५/०२/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – भगवान पाटील यांची जागा, पश्चिमेस – भालेराव यांची जागा, दक्षिणेस – रस्ता, उत्तरेस – भालचंद्र पोपलवार.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४३७

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०७ मालमत्ता क्र. २२७/३२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मोहम्मद अफरोज मो. पाशा २. अजिमा बेगम मो. पाशा रा. हिमायतनगर महोल्ला बाजार चौक यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२७/३२ वार्ड न. ०६ दत्तात्रय विठ्ठलराव ढाले यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४५३/२०२६ दि. २३/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – अब्दुल नय्युम अब्दुल खद्दुस, पश्चिमेस – ०६ मीटर रस्ता, दक्षिणेस – शेख अमीर, उत्तरेस – शेख बिलाली शेख लाल.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४३८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० अ मालमत्ता क्र. ६० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अभिषेक गणेशराव लुमदे रा. हिमायतनगर कार्ला पी मोहल्ला यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६० वार्ड न. १० अ गुलमोहम्मद खान नुरोद्दीन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४८६/२०२६ दि. २८/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – खुली जागा, पश्चिमेस – प्लॉट नं. ५१, दक्षिणेस – कॉलनी रस्ता, उत्तरेस – प्लॉट नं. ४९.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४३९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० अ मालमत्ता क्र. ५९ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अभिषेक गणेशराव लुमदे रा. हिमायतनगर कार्ला पी मोहल्ला यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५९ वार्ड न. १० मोहम्मद एजाज मोहम्मद हनिफ यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४७२/२०२६ दि. २६/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – घर क्र. ६० ची जागा, पश्चिमेस – घर क्र. ५८ ची जागा, दक्षिणेस – रस्ता, उत्तरेस – रामचंद्र मारूडवार यांची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४४०

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१मालमत्ता क्र. ५५२ व ५२९ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अनुसया सैलू पतलेवाड रा. हिमायतनगर मोहल्ला धानोरा ज यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५२२ व ५२९ बाबुराव लच्छन्ना ओद्दीवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ३७१/२०२६ दि. ०९/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – हिमायतनगर बोरगडी रस्ता, पश्चिमेस – ३० फुट रोड, दक्षिणेस – प्लॉट न. ६५ व ७४ ची जागा, उत्तरेस – प्लॉट क्र. ६७ व ७२ ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१९०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# उद्या 'तेरे सुर और मेरे गीत' कार्यक्रमाची मेजवानी

### गायिका मेघा संजीवन यांच्यासह नांदेड, मुंबई, आणि नागपूरच्या कलावंतांचा सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील प्रसिद्ध गायिका मेघा संजीवन यांच्या 'तेरे सुर और मेरे गीत' (पर्व सहा) या सांगितीक कार्यक्रमाची नांदेडकरांना शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी मेजवानी मिळणार आहे. या कार्यक्रमात नांदेडमधील कलावंतांसह मुंबई आणि नागपूरच्या कलावंतांचा सहभाग असणार आहे. यात सलग १६ तास सलग गायनाचा विश्वविक्रम केलेले प्रसिद्ध गायक संतोष कपारे यांचाही समावेश असून, दैनिक 'गोदातीर समाचार'चे संपादक केशव घोणसे पाटील हेही विविध गायकांनी गायलेली सदाबहार गीते सादर करणार आहेत.

येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह (स्टेडियम जवळ) येथे होणार असलेल्या या कार्यक्रमास विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, महापौर कविता संतोष मुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अजरामर गायक लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांच्यासह दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना समर्पित या कार्यक्रमात मो. रफी, लता मंगेशकर यांच्यासह किशोरकुमार, आशा भोसले, सुमन कल्याणपूर यांच्यासह विविध गायकांनी गायलेली गीते या कार्यक्रमात सादर होणार आहेत. या कार्यक्रमात नांदेडच्या शास्त्रीय आणि सुगम संगीतातील प्रसिद्ध गायिका मेघा संजीवन यांच्यासह, सलग १६ तास गाण्याचा विश्वविक्रम करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड नाव नोंद असणारे मुंबईतील प्रसिद्ध गायक संतोष कपारे, दैनिक 'गोदातीर समाचार'चे संपादक केशव घोणसे पाटील, इंजि. जयचंद्र तत्तापुरे, सावजी दुमाने, मयूर सावजी हे विविध गीते सादर करणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुंबईचे प्रसिद्ध निवेदक आरजे नासिर खान हे करणार आहेत. त्याचबरोबर खास अशी म्युझिशियन टीम या कार्यक्रमात असणार आहे. ज्यात अरविंद उपाध्याय (नागपूर), किरण यादव (मुंबई), चंद्रशेखर सावंत (मुंबई) यांच्यासह चेतन चित्ते, रतन चित्ते, शुद्धोधन कदम, स्वप्नील धुळे, किशोर आवटे आणि हंसराज चित्ते हे अनुभवी वादक कार्यक्रमाला संगीत देणार आहेत.

'तेरे सुर और मेरे गीत' या कार्यक्रमात विविध वाद्य खास आकर्षण असणार आहेत. ज्यात सॅक्सोफोन, बासरी, गिटार यासह विविध वाद्यांचा समावेश असणार आहे. या कार्यक्रमात सर्वांना नि:शुल्क प्रवेशिकेद्वारे प्रवेश राहणार आहे. या कार्यक्रमास सर्व रसिक, प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांगितीक मेजवानीचा आनंद घ्यावा, असे आवाहन या कार्यक्रमाच्या निर्मात्या आणि प्रमुख गायिका मेघा संजीवन यांच्यासह संयोजक संजीवन गायकवाड व नंदा गायकवाड यांनी केले आहे.




स्वारातीम विद्यापीठ प्रशासनाचे विद्यार्थीहिताला प्राधान्य

# एमएच-सीईटीमुळे प्रलंबित परीक्षा पुन्हा घेण्यात येणार

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी- २०२६ सत्राच्या परीक्षा सुरू आहेत. विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमातील काही विषयांच्या परीक्षा आणि एमएच-सीईटी परीक्षा एकाच दिवशी येत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून दिलासादायक निर्णय जाहीर केला आहे.

विद्यार्थी तसेच विविध विद्यार्थी संघटनांच्या मागण्यांची दखल घेत परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. २ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या विशेष बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. संपूर्ण परीक्षा पुढे ढकलल्यास अंतिम वर्षाच्या निकालात विलंब होण्याची शक्यता लक्षात घेऊन, ज्या विद्यार्थ्यांच्या एमएच-सीईटी आणि विद्यापीठाच्या परीक्षा एकाच दिवशी आहेत, त्यांच्यासाठी स्वतंत्र विशेष परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी एमएच-सीईटी परीक्षा नियोजित वेळेत देऊन, नंतर आपले एमएच-सीईटी परीक्षेचे प्रवेशपत्र व उपस्थिती अहवाल महाविद्यालयांच्या प्रचार्यांमार्फत दि. १८ एप्रिल २०२६ पर्यंत विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे. पुराव्यांची पडताळणी झाल्यानंतर विशेष परीक्षा विद्यापीठ मुख्य परिसर, नांदेड, उपकेंद्र लातूर, परभणी व न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथील निश्चित केंद्रांवर घेण्यात येणार आहेत. दरम्यान, सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असून, महाविद्यालयांनी ही माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन विद्यापीठातर्फे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

# 'गोदावरी अर्बन'चा विक्रम: ३०७९ कोटी ठेवींचा टप्पा पार



**नांदेड (प्रतिनिधी)** –गोदावरी अर्बनने मागील आर्थिक वर्षात नेत्रदीपक प्रगती नोंदवत ३०७९ कोटी रुपयांच्या ठेवींचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे. तसेच बँकेचा एकूण व्यवसाय ५५५५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून, सहकार क्षेत्रात ही एक ऐतिहासिक कामगिरी मानली जात आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून संस्थेचे कौतुक होत आहे.

अध्यक्षा राजश्री पाटील यांनी सांगितले की, बँकिंग क्षेत्रात आर्थिक वर्षाच्या शेवटचा आठवडा म्हणजे ट्वेंटी-ट्वेंटी सामन्यासारखा थरार अनुभवायला मिळतो. गेले आर्थिक वर्ष सर्वच सहकार क्षेत्राला आव्हानात्मक असतानाही संस्थेने ठेवी वाढीसोबतच नियमित कर्जफेड करणारे उत्कृष्ट कर्जदार निर्माण करण्यावर भर दिला. ज्या गतीने आपण काम करत आहोत, त्या गतीने येणारे वर्ष अधिक यशस्वी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हे यश ग्राहकांचा विश्वास आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समर्पित कार्यामुळेच शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, गोदावरी अर्बन दिवसागणिक सहकार क्षेत्रात नवे विक्रम प्रस्थापित करत आहे. संस्थेने प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करत 'सेंट्रल हब'च्या माध्यमातून फेसलेस पद्धतीने कर्ज वितरण सुरू केले आहे. कर्ज मंजुरीपूर्वी कागदपत्रांची काटेकोर तपासणी केली जाते. व्यवसाय आणि ग्राहकसंख्या वाढत असताना जबाबदाऱ्याही वाढत आहेत. त्यासाठी कार्य कुशल मनुष्यबळ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले जाते. संचालक प्रा. सुरेश कटकमवार यांनीही हे आर्थिक वर्ष संस्थेसाठी अभिमानास्पद ठरल्याचे सांगितले. ठरवलेली सर्व आर्थिक उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण झाली असून पुढील काळातही संस्थेची प्रगती अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, रुद्र राजश्री हेमंत पाटील यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सेक्रेड हार्ट युनिव्हर्सिटीमधून 'मास्टर ऑफ सायन्स इन फायनान्स अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट' हा अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे. सध्या ते लॉजिस्टिक क्षेत्राशी संबंधित कंपनीत कार्यरत असून, नुकतेच मायदेशी परतल्याच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी आपले अनुभवही मांडले. यावेळी उपमहा व्यवस्थापक सुरेखा दवे यांनी संस्थेच्या पहिल्या आर्थिक वर्षाच्या आठवणींना उजाळा देत सर्वांचे आभार मानले.

या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष ना. हेमंत पाटील यांनी अध्यक्ष राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, संचालक मंडळ, विदर्भाचे विशेष योगदान देणारे उपसरव्यवस्थापक रवि इंगळे, ग्राहक, ठेवीदार व सभासदांचे अभिनंदन केले. यावेळी अध्यक्षा राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव अ‍ॅड. रविंद्र रगटे, संचालक प्रा. सुरेश कटकमवार, रुद्र पाटील, वैधानिक लेखा परीक्षक जीवन लाभशेटवार, लेखा परीक्षक अली अजगर हुसेन, उपमहा व्यवस्थापक सुरेखा दवे, उप सरव्यवस्थापक विजय शिरमेवार,विपणन अधिकारी महेश केंद्रे, अधिकारी अशोक संगावार, डेप्युटी मॅनेजर प्रशांत कदम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाचा लातूरमध्ये छापा

### १३ लाख रुपयांचा गुटखा व मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी मागील पंधरावड्यामध्ये नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम उघडली होती. सदर मोहीम दि. ३१ मार्च रोजी संपन्न झाली. मात्र, मोहिमेचा कालावधी संपताच, गुटखा विक्रेते आपला कारभार पुन्हा सुरू करणार आहेत, अशी माहिती प्राप्त झाली होती. या अनुषंगाने, बारकाईने पाळत ठेवली असता, एका मारुती एर्टिगा वाहनामधून प्रतिबंधित गुटखा हा लातूर जिल्ह्यातील वाढवणा मार्गे अहमदपूरकडे घेऊन जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली.

मिळालेल्या बातमीनुसार, पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाने दि. १ एप्रिल रोजी पोलीस ठाणे वाढवणा हद्दीतील बाभूळगावाजवळ सदरची एर्टिगा थांबवली असता, सदर वाहनात विक्री करण्यासाठी घेवून जात असलेला ६,२४,०००/- रुपयांचा गुटखा मिळून आला. सदर कारवाई दरम्यान ६,२४,०००/- रुपयांचा गुटखा व एक मारुती सुझुकी कंपनीची एर्टिगा असा एकूण १३,२४,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपी फय्युम अब्दुल रऊफ शेख वय ४३ वर्ष, व्यवसाय पानपट्टीचालक, रा. गडीगल्ली, अहमदपूर, निसार गफ्फार बिस्ती वय २६ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. बागवान गल्ली, अहमदपूर व मौजन आजम सय्यद, अहमदपूर यांच्याविरुद्ध वाढवणा पोलीस ठाणे येथे गुरनं ८३/२०२६ कलम १२३, ६२, २२३, २७४, २७५, ३ (५), भारतीय न्यायसंहिता सहकलम ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस ठाणे वाढवणा येथील पोउपनि हालसे हे करीत आहेत. गुटखा व इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ जसे, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमिश्रकेयुक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधी सुपारी, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक या विरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात येते. सदर कलमाप्रमाणे केलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा वर्षापर्यंतच्या कारावासासह द्रव्यदंडाची देखील शिक्षा आहे.



या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. मागील काही दिवसांपासून या पथकाने अवैध व्यवसायांच्या विरुद्ध उल्लेखनीय व धाडसी कामगिरी केली असून, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

# हनुमान जन्मोत्सव निमित्ताने पुरणपोळीचा महाप्रसाद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –हनुमान जन्मोत्सव निमित्ताने गावातील हनुमान मंदिर येथे अभिषेक व विधीवत पूजन केल्यानंतर ग्रामस्थांना पुरण पोळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनीही दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.

मागील १३ वर्षांप्रमाणे यंदाही २ एप्रिल २६ रोजी हनुमान जन्मोत्सव निमित्ताने गावातील जाज्वल्य असलेल्या हनुमान मंदिर येथे हनुमान जन्मोत्सव निमित्ताने काकडे व सुरेश महाराज विधीवत पूजन अभिषेक करण्यात आले. यानंतर ग्रामस्थ व भाविकभक्तांसाठी यावर्षी महाप्रसाद म्हणून यावेळी पुरी-सिरा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# स्नेचिंग प्रकरणातील दोन आरोपींना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे संरक्षण दलाने ऑपरेशन रेल सुरक्षा आणि ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत गुप्त माहिती व सतर्क देखरेखीच्या आधारे रेल्वे मालमत्ता व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी केलेल्या कारवाईत महत्त्वपूर्ण यश मिळविले आहे.

बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे उपनिरीक्षक के. चंदुलाल, तसेच गणेश काळे आणि रणजीत सिंघ यांच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर चिकलठाणा दरम्यान गुप्त पाहणी करून छत्रपती संभाजीनगर स्थानक यार्डमधून चोरी झालेल्या रेल्वे साहित्याच्या प्रकरणातील आरोपीचा शोध घेतला. कारवाईदरम्यान स्थानक यार्डातील रेल्वे रुळाजवळ संशयित व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले. पंचांच्या उपस्थितीत चौकशी केल्यावर त्याने आपले नाव सनी, राहणार छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. चौकशीदरम्यान त्याने २२ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानक यार्डमधून सुमारे ३० मीटर कॅटेनरी वायर (तांबे) आणि ७.५ मीटर डिस्चार्ज केबल चोरी करून ती रेल्वे रुळाजवळ लपवून ठेवल्याची कबुली दिली. सदर चोरीचा माल आरोपीने दाखविलेल्या ठिकाणाहून जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध आरपीएफ पोस्ट/छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा क्रमांक ०२/२०२६, कलम ३(अ), अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.

# गणेशनगर येथे पंचमुखी हनुमान जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)**–हनुमान जयंतीनिमित्त गणेशनगर येथील पंचमुखी हनुमान मंदिरात सकाळी अभिषेक करुन विविध धार्मिक कार्यक्रमांन हनुमान जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी मंदिरातील पंचमुखी हनुमानाच्या मूर्तीला पवित्र वस्त्र, अलंकार, फुलांची आकर्षक सजावट तसेच रोषणाई करण्यात आली होती.

या प्रसंगी महिला मंडळाच्या वतीने वंदना गंभीरे, माहेश्वरी कौडगे, ज्योती कुंडगुलवार, स्वाती अडकिने, शकुंतला मानधने, सौ. भुतडा, अनुराधा भाकरे, अनुराधा पांडे, सौ. देशमुख, मोनाली पाटील, हेमा सारडा व ऊर्मिला सोनी यांनी भावपूर्ण सुंदरकांडाचे सादरीकरण करून वातावरण भक्तिमय केले. सुंदरकांड सादर करणाऱ्या महिला मंडळाचा मीना सामते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. मंदिराचे अध्यक्ष विजय गंभीरे, उपाध्यक्ष भारत पाटील, सचिव जयेंद्र पाटील, सहसचिव अजय अडकिने, महेंद्र कुंडगुलवार, मिलिंद कुलकर्णी, बालाजी गाडेगावकर यांनी पंचमुखी हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करून हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# चाकूने भोसकून एकाचा खून

**नांदेड (प्रतिनिधी)**– भोकर तालुक्यातील भोसी येथे ३१ मार्च रोजी जुन्या वादातून रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान बसस्थानकाजवळील पानटपरी समोर एका तरुणाचा चाकूने भोसकून खून करण्यात आला. मृत तरुणाचे नाव आदित्य काशीनाथ डुब्बेवाड (२३), रा. शेंबोली ता. मुदखेड) असे आहे.

आदित्य डुब्बेवाड याच्यासोबत जुन्या भांडणाचा राग बाळगत आरोपी अभिजीत प्रभाकर कल्याणकर (रा. भोसी) व त्याच्यासोबत असलेल्या एका अनोळखी साथीदाराने मोटारसायकलवर येत त्याला लक्ष्य केले. आरोपींनी आदित्यवर अचानक हल्ला चढवत चाकूने वार केले. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला आणि उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# अर्धापूरच्या 'त्या' १०२ शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्र्यांचे कार्यवाहीचे निर्देश

### खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी वेधले लक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)**– सन २०२५-२६ मधील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या अर्धापूर येथील १०२ शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरींना मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोजगार हमी योजना विभागाच्या प्रधान सचिवांना दिले आहेत. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि भोकर विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा आमदार श्रीजया चव्हाण यांनी मुंबई येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले होते.

ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार, अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष मदत पॅकेज जाहीर करण्यात आले होते. यात खचलेल्या किंवा बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी 'मनरेगा'च्या माध्यमातून मदत देण्याची तरतूद होती. अर्धापूर नगरपंचायत हद्दीतील १०२ बाधित शेतकऱ्यांनी यासाठी रीतसर अर्ज करून पंचनामेही पूर्ण केले होते. मात्र, 'मनरेगा' ही योजना केवळ ग्रामीण क्षेत्रापुरती मर्यादित असल्याने आणि अर्धापूर हे नगरपंचायत (शहरी) क्षेत्र असल्याने, तांत्रिक कारणास्तव या शेतकऱ्यांची मदत प्रलंबित राहिली होती.

बाधित शेतकरी नगरपंचायत हद्दीतील असला तरी त्याचे नुकसान ग्रामीण भागातील शेतकऱ्यांइतकेच गंभीर आहे. केवळ तांत्रिक निकषांमुळे हे शेतकरी मदतीपासून वंचित राहणे अन्यायकारक ठरेल. राज्य सरकारने विशेष पॅकेजच्या माध्यमातून शेतकऱ्यांना भक्कम आधार दिला आहे. अर्धापूरचे १०२ शेतकरी त्या मदतीपासून वंचित राहणे योग्य ठरणार नाही, असे खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नमूद केले. या बाबीची मुख्यमंत्र्यांनी तातडीने दखल घेत रोहयो विभागाला कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

# मनपाने देगलूर नाका परिसरातील अतिक्रमण हटविले; अनेकांनी पथकासोबत घातली हुज्जत

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील देगलूर नाका भागात मुख्य रस्ता आणि फुटपाथवर मागील अनेक वर्षांपासून थाटण्यात आलेले अतिक्रमण गुरूवारी महापालिकेच्या अतिक्रमण पथकाने काढून टाकले. पोलीस बंदोबस्तात करण्यात आलेल्या या कारवाईत पथकाने २ ट्रॅक्टर साहित्य जप्त केले. यावेळी पथकासोबत काही अतिक्रमणधारकांनी हुज्जत घालून गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला.

देगलूर नाका भागातील मुख्य रस्ता अत्यंत वर्दळीचा आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून येथील कापूस संशोधन केंद्रालगत असलेल्या फुटपाथवर अनेक फळ विक्रेते, सोफा, फर्निचर विक्रेते, फुलविक्रेता आणि इतर विक्रेत्यांनी आपली दुकाने थाटून अतिक्रमण केले होते. रस्त्यावरही अनेकांनी बस्तान मांडले होते. यामुळे रस्ता अरूंद होऊन अपघाताचे प्रमाण वाढले होते. तर नागरिकांनाही पायी चालणे अवघड झाले होते. अखेर नागरिकांच्या तक्रारींची महापालिकेने दखल घेतली. उपायुक्त अजितपालसिंघ संधू व सहायक आयुक्त रावण सोनसळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण हटाव पर्यवेक्षक विशाल सोनकांबळे यांच्यासह पथकाने वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक जगन पवार यांच्यासमवेत पोलीस बंदोबस्तात गुरूवार, दि. २ एप्रिल रोजी सकाळी या भागात जेसीबीच्या सहायाने कारवाई करण्यात आली.

येथील कापूस संशोधन केंद्रालगतच्या फुटपाथासह रस्त्यावरील कच्च्या दुकानांचे अतिक्रमण हटविले. यात पत्रकार शेख याहीया यांचेही कार्यालय काढण्यात आले. या कारवाईत २ ट्रॅक्टर साहित्य जप्त करण्यात आले, अशी माहिती मिळाली.

# २ ते ८ एप्रिल या कालावधीत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'महा-साधना सप्ताह'

**नांदेड (प्रतिनिधी)** – भारत सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. सर्व शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय दैनंदिन कामकाजात करुन सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

राज्यात महा-साधना सप्ताह या टेक लर्निंग वीक अंतर्गत अधिकारी आणि कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करावयाचे आहे. यामुळे अधिकारी आणि कर्मचारी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम उपलब्ध असून ते अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे राहील.

या सप्ताहाच्या अनुषंगाने विविध शासकीय कार्यालये, यामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन त्यांना नेमून दिलेले अभ्यासक्रम या काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी किमान ४ तास असणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या (iGOT) पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे विभागांना महाराष्ट्रात मे महिन्यात होणाऱ्या 'TECH-वारी २.०' मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

साधना सप्ताह हा iGOT कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वत:च्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. तेव्हा या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४


ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com